रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २६३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, १२ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
आरक्षणाचा निर्णय हे महात्मा फुले यांना खरे अभिवादन/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
टीआयपीएल अंडर-१९ क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन/८

## मराठवाडा आणि विदर्भात भूकंपाचे सौम्य धक्के



**छत्रपती संभाजीनगर** : मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांना शनिवारी (दि.११) सकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. वर्ल्ड इक्यू लोकेटर या एक्स हँडलवर भूकंपाच्या केंद्राची माहिती देण्यात आली आहे. पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार मराठवाड्यातील नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भातील वाशिम जिल्ह्याला भूकंपाचे धक्के जाणवले. हिंगोली जिल्ह्याच्या वसमत येथे भूकंपाचे केंद्र असून सकाळी ८.४५ वाजता ४.५ रिश्टर स्केलच्या भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याचे वर्ल्ड इक्यू लोकेटरने म्हटले आहे तसेच भूकंपाच्या केंद्राची खोली सुमारे १० किमी असल्याचेही नमूद केले आहे. ही नोंद लातूर येथील भूकंप मापन केंद्रावर झाली. भूकंपाची तीव्रता कमी असल्यामुळे कोणतीही जीवित आणि जास्त वित्तहानी झाली नसली तरी काही ठिकाणी नागरिकांमध्ये घबराट पसरल्याचे दिसून आले.

# माथेरानच्या विकासासाठी भाजप प्रयत्नशील

## आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही; माजी नगरसेवकांसह हातरिक्षा संघटना सदस्य भाजपमध्ये

**माथेरान, पनवेल : प्रतिनिधी**

माथेरानचा विकास व्हावा या दृष्टिकोनातून भारतीय जनता पक्ष काम करीत आहे. हातरिक्षा चालक हे पर्यटनस्थळाच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचा घटक असून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन आणि भाजप कटिबद्ध आहे. आगामी काळात तुम्हाला अधिकाधिक शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे आयोजित कार्यक्रमात दिली.



माथेरान येथील माजी नगरसेवक दिनेश सुतार, संतोष लखन आणि संतोष शिंदे यांनी शनिवारी (दि. ११) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी माथेरानमधील हातरिक्षा संघटनेच्या सदस्यांनीदेखील 'कमळ' हाती घेतले. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले. त्यावेळी ते बोलत होते.

पनवेल शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माथेरानचे उपनगराध्यक्ष संतोष शेलार, भाजप शहर अध्यक्ष व नगरसेवक प्रवीण सकपाळ, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, उपाध्यक्ष किरण चौधरी, सरचिटणीस तथा माथेरान व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष राजेश चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे यांच्यासह पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजप शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंजारराव, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेविका प्रीती जॉर्ज आदी उपस्थित होते.

यावेळी माथेरानमधील माजी नगरसेवक दिनेश सुतार, संतोष शिंदे, संतोष लखन यांच्यासह हातरिक्षाधारक दिप्ती गणेश सुतार, भारत कारंडे, संतोष लखन, आशिष सावंत, गणेश कांबळे, सुमन रावखंडे, झहूर चिपाडे, बबन शेलार, शैलेश शेलार, रोशन मुर्तझा, उज्ज्वला राणे, चंद्रकांत चावरे, अनिता चावरे, सुनील कोळी, संगीता कोळी, संतोष शिंदे, तुषार जांभळे, शिवाजी साळुंखे, अफजल डोंगरे, संतोष निचिंदे, प्रवीण गायकवाड, मनोज रेणोसे, अक्षय सकपाळ, अल्ली डोंगरे, अरफार शेख, शहजाद शेख यांनी आपल्या कुटुंबासह विकासाचे 'कमळ' हाती घेतले. या सर्वांचे भाजपमध्ये स्वागत करण्यात आले.

## 'आरटीई' अंतर्गत एक लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळाला प्रवेश

**पुणे : प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या लॉटरीतून एक लाख पाच हजार ५८२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे.

'आरटीई' अंतर्गत राज्यातील आठ हजार ७०१ शाळांतील एक लाख १४ हजार २८५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. या जागांसाठी दोन लाख ८९ हजार ३८५ अर्ज दाखल झाले होते. प्रवेशाच्या जागांपेक्षा अर्जांची संख्या जास्त असल्याने ६ एप्रिल रोजी लॉटरी काढण्यात आली. त्यातून एक लाख ५ हजार २२९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे, तर ८६ हजार ३४ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी करण्यात आली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईलवर प्रवेशासाठी एसएमएस पाठवण्यात येणार आहेत, परंतु पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता संकेतस्थळावरून लॉटरी तपासून प्रवेशासाठी निवड झाली आहे की नाही याची माहिती घ्यावी तसेच गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांच्याकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी समितीमार्फत पडताळणी करावी. त्यांनी प्रमाणित केल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन प्रत उपलब्ध करून द्यावी, असे कळविण्यात आले आहे.

## स्कूल बसचे भाडे आता सरकार ठरवणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित करण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण स्कूल बसचे भाडे निश्चित करणार असून पालकांकडून एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम २०२६ या सुधारित नियमावलीचा मसुदा गृह विभागाने प्रसिद्ध केला असून यावर १५ दिवसांत हरकती व सूचना



नोंदवण्याचे आवाहन परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

काही शाळा आणि बस कंत्राटदार पालकांकडून वर्षभराचे भाडे आगाऊ घेतात. नव्या नियमानुसार आता केवळ मासिक भाडेच आकारता येईल तसेच प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी स्थापन करणे अनिवार्य असून ही समिती भाडे व तक्रारींचे निवारण करेल. (पान २ वर..)

### वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, पालकांना अलर्ट जाणार

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आता केवळ सीसीटीव्ही पुरेसे नसून प्रत्येक बस आणि व्हॅनमध्ये जीपीएस आधारित 'व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस' आणि पॅनिक बटण बसवणे बंधनकारक असेल. वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, विद्यार्थ्यांची डिजिटल उपस्थिती आणि स्वयंचलित अलर्ट पालकांना मिळणार आहेत. बसेसमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा आणि सर्व प्रवाशांसाठी सीट बेल्ट अनिवार्य करण्यात आले आहेत.

## 'इच्छांचे दीप प्रवाही' पुस्तकाचे प्रकाशन; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन या सेवाभावी दाम्पत्याच्या कार्यस्मृती जागवणारे तसेच डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सेवावाटचालीचा सविस्तर आणि प्रेरणादायी आढावा घेणारे 'इच्छांचे दीप प्रवाही' या संग्राह्य पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी (दि.११) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ यांच्या हस्ते झाले. आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.





व्यासपीठावर प्रसिद्ध ज्येष्ठ नेत्र शल्यविशारद डॉ. सुहास हळदीपुरकर, धूतपापेश्वर कंपनी लि.चे सीईओ रणजीत पुराणिक, कुलाबा जिल्हा संघचालक संतोष सुतार, रुग्णालय कार्यकारिणीच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र, पुस्तकाचे लेखक सुधीर जोगळेकर आदी उपस्थित होते.

'इच्छांचे दीप प्रवाही' हे पुस्तक डॉ. प्रभाकर पटवर्धन आणि नीलाताई पटवर्धन यांच्या वैद्यकीय आणि सामाजिक सेवाकार्याचा प्रेरणादायी प्रवास उलगडणारे आहे. (पान २ वर..)

## निवडक

### पंतप्रधान मोदींचा राहुल गांधींशी संवाद; सोनियांची केली विचारपूस





**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीत शनिवारी (दि.११) महात्मा जोतिबा फुले यांना अभिवादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी संवाद साधला. संसदेच्या आवारातील प्रेरणा स्थळ येथे झालेल्या या कार्यक्रमाला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान मोदींनी ज्येष्ठ काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या तब्येतीची राहुल यांच्याकडे विचारपूस केली.

### ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका

**मुंबई** : प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांना शनिवारी (दि.११) हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीबद्दल कुटुंबियांकडून अधिक माहिती मिळू शकली नाही.

## मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरचे पार्किंगमध्ये लँडिंग





**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ पुण्यात एका कार्यक्रमाला जात असताना त्यांचे हेलिकॉप्टर नियोजित हेलिपॅडवर उतरवण्याऐवजी पायलटने ते थेट कार पार्किंगच्या जागेत उतरवले. या अनपेक्षित प्रकारामुळे उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार मंत्री भुजबळ हे महात्मा फुले जयंतीनिमित्त पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या खानवाडी या गावात आयोजित कार्यक्रमासाठी जात होते. या ठिकाणी स्वतंत्र हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली होती, पण हेलिकॉप्टरच्या पायलटला कार पार्किंगमध्ये फारशा गाड्या नसल्याने हेच हेलिपॅड असल्याचे वाटले आणि त्या मोकळ्या जागेत त्याने हेलिकॉप्टर उतरवले.

पोलिसांनी तत्काळ पायलटला ही जागा अधिकृत हेलिपॅड नसल्याचे ओरडून सांगितले. आपली चूक लक्षात आल्यावर पायलटने पुन्हा इंजिनचा जोर वाढवला आणि हेलिकॉप्टर हवेत झेपावले. त्यानंतर काही अंतरावर असलेल्या नियोजित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नसले तरी काही काळ परिसरात गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

### चौकशी होणार –मुख्यमंत्री

दरम्यान, कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांनी घडलेल्या प्रकाराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता, मंत्री छगन भुजबळ सुरक्षित आहेत, पण पायलटचा निष्काळजीपणा उघड झाल्याचे त्यांनी सांगितले तसेच या प्रकाराची तत्काळ चौकशी करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

## पनवेलमध्ये आज बासरी मैफिल रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'कृष्ण वेणूनाद' या बासरी मैफिलीचे आयोजन येथील रंगरचना कला मंचाच्या वतीने करण्यात आले आहे. ही मैफिल रविवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर होईल.

ज्येष्ठ बासरीवादक एकनाथ ठाकूर गुरुकुल निर्मित या मैफिलीत ५०हून अधिक बासरीवादक भगवान श्रीकृष्णाच्या बासरीच्या माधुर्याची अनुभूती देणारी सुरेल मैफल पेश करणार आहेत. यावेळी इंडियन आयडल फेम गायिका प्राजक्ता गावंड यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. मैफिलीचे संगीत संयोजन विवेक ठाकूर यांचे असून निवेदन विजय पवार करणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे.



**पनवेल : पंचक्रोशित प्रसिद्ध असणाऱ्या गव्हाणच्या शांतादेवीची यात्रा शनिवारपासून सुरू झाली. दोन दिवस चालणाऱ्या या यात्रेला शेकडो वर्षांची परंपरा आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी शांतादेवीचे मनोभावे दर्शन घेतले. सोबत ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख व इतर.**




# पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांना वेग

### सभापती, उपसभापतींचा अधिकाऱ्यांसमवेत दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीमधून शेतकरी कामगार पक्षाची सत्ता जाऊन प्रथमच भारतीय जनता पक्षाचा सभापती विराजमान झाल्यानंतर ग्रामीण व आदिवासी भागातील विकासकामांना वेग आल्याचे चित्र दिसू लागले आहे. याच पार्श्वभूमीवर वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघातील मोरबे, खैरवाडी, शिरवली आणि खानाव ग्रामपंचायत हद्दीतील एकूण १३ आदिवासीवाड्यांना पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती यांनी अधिकाऱ्यांसमवेत शनिवारी (दि.११) भेट देत थेट पाहणी केली.





या दौऱ्यात पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, पंचायत समिती सदस्य अंकुश खेरे, कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच सदाशिव वास्कर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

खैरवाडी, तामसई, फणसवाडी, करंबेळी, भल्याचीवाडी, येरमाळ, कोंडप, वांगणी, पाले ठाकूरवाडी, शिवाचीवाडी, महाळुंगी गावदेवीनगर आदी वाड्यांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन शाळा, अंगणवाडी, वीज, आरोग्य उपकेंद्र आणि पाणीटंचाई यांसारख्या मूलभूत समस्यांची सविस्तर पाहणी करण्यात आली.

यावेळी बोलताना सभापती रंजना भास्कर यांनी सांगितले की, भाजप सत्तेत आल्यानंतर ग्रामीण आणि आदिवासी भागातील विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे. स्थानिकांच्या समस्या प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन समजून घेत त्या तातडीने सोडवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

पाणीटंचाईच्या समस्येबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या ठिकाणी गरज आहे, त्या ठिकाणी बोअरवेल (बोरिंग) करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

एकूणच पंचायत समितीमध्ये भाजप सत्तेत आल्यानंतर केवळ कागदी आश्वासनांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष वाड्यांमध्ये जाऊन समस्या जाणून घेण्यावर भर दिला जात आहे.

# महिलांना लोकसभा आणि विधानसभेत आरक्षण देण्याचा निर्णय हे महात्मा फुले यांना खरे अभिवादन -मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मुळगाव खानवडी (ता. पुरंदर) येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर झेप घेण्याची क्षमता निर्माण होत असून काही विद्यार्थिनी इस्रो आणि नासासारख्या संस्थांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितल

स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत त्यांनी भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध लढा देत विधवांचे केशवपन थांबवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढून पहिली शिवजयंती साजरी करण्याचे कार्यही महात्मा फुले यांनीच केले, असे त्यांनी सांगितले. आजचा शिक्षणाचा अधिकार कायदा ही त्याच विचारांची फलश्रुती असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राज्य शासन 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' राबवत असून त्याअंतर्गत नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार दिले जात आहेत. 'महाज्योती'च्या माध्यमातून ओबीसी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले असल्याचे फडणवीस म्हणाले.

## घर देण्याच्या बहाण्याने साडेचौदा लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

सदनिकेसाठी १४ लाख ५० हजार रुपये घेऊन सदनिका दिल्या नाहीत तसेच रक्कम देखील परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक तुषार शिंदे (रा. कामोठे) याच्याविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बांधकाम व्यावसायिक तुषार शिंदे यांनी फिर्यादी आणि साक्षीदार यांना करंजाडे येथील रूम विकत देतो, असे सांगितले आणि ३१ लाख ८० हजार ५०० रुपयांमध्ये व्यवहार ठरला, आणि दोघांकडून ५४ लाख ५० हजार रुपये रक्कम स्वीकारली. या बदल्यात सदनिका दिल्या नाहीत. शिवाय दिलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याने शिंदेविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## मुलानेच फोडली तिजोरी

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये घरातील तिजोरीतून मुलानेच सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा सुमारे १८ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा केला आहे.३० मार्च ते ४ एप्रिलदरम्यान सेक्टर ३७ येथील महावीर हेरिटेजमधील घरातून श्रवण सतीश मांढरे याने तिजोरीत ठेवलेले सुमारे साडेसोळा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम लंपास केली. घटनेची तक्रार दाखल झाल्यानंतर खारघर पोलिसांनी आरोपीला अटक केली. न्यायालयाने त्याला १३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

## पोक्सो आणि पिटा कलमानव्ये नवरा-बायकोला सश्रम कारावास

**पनवेल : वार्ताहर**

आश्रित म्हणून राहणाऱ्या चिमुकली आणि तिच्या मोठ्या बहिणी कडून वेश्या व्यवसाय करवून घेत त्यातून गुजराण करणाऱ्या नवरा बायकोला २० वर्ष सश्रम कारावास आणि ३३ हजार रुपयांचा दंड आणि दंड नं भरल्यास ६ महिने सश्रम कारावास हि शिक्षा न्यायाल्याने ठोठावली आहे. बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध आणि जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडल्या प्रकरणी नवरा बायकोला अशी शिक्षा झाल्याचे पहिलेच उदाहरणं असल्याचे बोलले जात आहे.

२०१९ मध्ये रबाळे पोलीस ठाणे अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाने केलेल्या कारवाईत दोन मुलींची सुटका करण्यात आली होती. त्या पीडित मुलींनी पोलिसांना धक्कादायक माहिती दिली. त्यानुसार त्या दोघी बहिणी असून त्यातील एक अल्पवयीन होती. त्याच्या आई वडिलांचे निधन झाल्या नंतर त्या त्यांचे नातेवाईक असणाऱ्या राजेश सोनाजी शिंदे ( वय ४२ ) आणि त्याची पत्नी शुभांगी सोनाजी शिंदे ( वय ३७ वर्षे ) यांच्या कडे राहत होत्या. दोघींचे शिकण्याचे वय असताना शिंदे दांपत्याने त्यांना वेश्या व्यवसायाला जुम्पले होते. दुर्दैवाने अल्पवायीन मुली कडूनही हे कृत्य करवून घेतले जात होते.

ही गंभीर बाब समोर आल्यावर पोलिसांनी शिंदे दांपत्या विरोधात भारतीय दंड कलम ३७० लैंगिक शोषण तसेच बाल लैंगिक अत्याचार कलम ४,६, १७, वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणे (पिटा ) कलमनव्ये गुन्हा नोंद केला होता.या प्रकरणी दोघांना अटक करून राजेश शिंदे याला तळोजा कारागृह तर शुभांगी शिंदे हिला ठाणे कारागृहात ठेवण्यात आले होते.या गुन्ह्याचा खटला जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय (क्रमांक २) बेलापूर येथे न्यायाधीश मांडवगडे यांच्या कडे सुरु होता. अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून शशिकांत इघारे यांनी काम पाहिले.

शुक्रवारी या खटल्याचा अंतिम निकाल लागला. आरोपी राजेश शिंदे आणि शुभांगी यांच्यावर लावण्यात आलेले आरोप सिद्ध झाले. न्यायाल्याने नवरा बायकोला २० वर्ष सश्रम कारावासा आणि ३३ हजार रुपयांचा दंड आणि दंड नं भरल्यास ६ महिने सश्रम कारावास हि शिक्षा न्यायालयाने ठोठावली आहे.

## विसपुते कॉलेजच्या प्राध्यापिका गंगोत्री यादव यांना पीएचडी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल येथील प्राध्यापिका डॉ. गंगोत्री एस. यादव यांना मुंबई विद्यापीठाकडून विज्ञान व तंत्रज्ञान पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी आपले डॉक्टरेट संशोधन विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ फार्मसी, चेंबूर येथे डॉ. गंगा श्रीनिवासन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

आपल्या पीएच.डी. प्रवासादरम्यान डॉ. यादव यांनी उल्लेखनीय शैक्षणिक यश संपादन केले, ज्यामध्ये २ पेटंट्सचे प्रकाशन, विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये ३ संशोधन



पोस्टर्सचे सादरीकरण या गोष्टींचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष धनराज विसपुते, सचिव संगीता विसपुते आणि प्राचार्य डॉ. आशिष जैन तसेच संपूर्ण शैक्षणिक परिवाराने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. ही कामगिरी संस्थेच्या मजबूत संशोधन संस्कृती आणि शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

## जगण्याच्या शाळेत शिकलो आणि घडलो -कवी सौमित्र

**नवी मुंबई : बातमीदार**

अनुभवाच्या शाळेत शिकलो, जगण्याने खूप काही शिकवलं, त्यामुळे मी आज जो आहे आणि जसा आहे ते या जगण्यातून आलेलं संचित आहे असे सांगत सुप्रसिध्द अभिनेते किशोर कदम अर्थात कवी सौमित्र यांनी अनेक आठवणी सांगत, कविता म्हणत दिलखुलासपणे आपला जीवन प्रवास उलगडवला.

नवीमुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली सेक्टर १५ येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात बाबासाहेबांच्या जयंती उत्सवानिमित्त आयोजित 'जागर २०२६' या ३ तारखेपासून सुरू झालेल्या व्याख्यानमालेतील पाचवे पुष्प गुंफताना पत्रकार



अभिजीत करंडे यांनी किशोर कदम यांच्याशी संवाद साधला आणि नानाविध आठवणींचा खजिना खुला होत गेला.

आज प्रत्येक माणूस वेगवेगळ्या ज्ञानाच्या शोधात आहे असे सांगत प्रत्येकाची शाश्वततेची संकल्पनाही वेगवेगळी असल्याचे मत यावेळी किशोर कदम यांनी मांडले. आज आपण मुलांची नको इतकी काळजी घेतोय. खारदांडा कोळीवाड्यात जन्म आणि लहानपण गेले असल्याने समुद्राशी एक वेगळे नाते असल्याचे सांगताना त्यांनी आपल्या कवितेतून सातत्याने डोकावणारा समुद्र, पाऊस आणि आई यांच्याशी असलेले नाते उलगडवून दाखविले. माझ्या पालकांनी जर माझ्याकडे इतके लक्ष दिले असते तर मी आज आहे तसा झालोच नसतो असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.गारवा अल्बमच्या काळातील काही किस्से त्यांनी सांगितले. त्यातही, "बघ तुला माझी आठवण येते का?"या अत्यंत लोकप्रिय झालेल्या कवितेचा समावेश त्या अल्बममध्ये कसा झाला याची रंगतदार कहाणी त्यांनी सांगितली.

## भाजप स्थापना दिनानिमित्त शिरवणेत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नवी मुंबईः बातमीदार**

भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्ह्याच्या माध्यमातून तसेच भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिरवणे विद्यालय व जुनिअर कॉलेज सेक्टर-2 नेरूळ येथे बुधवार दिनांक 8 एप्रिल रोजी भाजपा स्थापना दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये सक्रिय कार्यकर्ता संमेलन, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांवर चर्चा करण्यात आली.



या प्रसंगी भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, प्रमुख वक्ता वसंत सुतार, नगरसेवक सुरेश शेट्टी, नगरसेविका डॉ. प्रणाली पाटील, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी महापौर सुष्मा दंडे, माजी नगरसेवक प्रभाकर भोईर, परिवहन समिती सदस्य राजेश राय लोकप्रतिनिधी, जिल्हा आजी-माजी पदाधिकारी, मंडळ पदाधिकारी, प्रर्कोष्ट, मोर्चा आजी माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी का कार्यक्रमाविषयी बोलताना डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, भाजपा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने भाजपा स्थापना दिनानिमित्त 5 ते 12 एप्रिलपर्यंत विविध कार्यक्रम घेण्याची सूचना राष्ट्रीय स्तरावरून आली होती. त्या अनुषंगाने आज सर्व कार्यकर्त्यांचं संमेलन पार पडलं. ज्यामध्ये भाजपाची मुहूर्तमेढ या नवी मुंबईमध्ये ज्यांनी केली, त्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा मानसन्मान करण्यात आला. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना वसंत सुतार यांच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचं काम यानिमित्ताने करण्यात आलं.

## एसटी तिकिटात दोन रुपये वाढ; १५ एप्रिलपासून स्वच्छता कर लागू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

एसटी महामंडळाने प्रवाशांना बससह बसस्थानक, तेथील स्वच्छतागृह, प्रतीक्षालयांत स्वच्छता उपलब्ध करून देण्यास १५ एप्रिलपासून प्रवाशांकडून स्वच्छता कर वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता प्रवाशांना प्रत्येक तिकिटामागे २ रुपये जादा मोजावे लागणार आहेत. बसस्थानक, स्वच्छतागृहे तसेच बसच्या स्वच्छतेबाबत बोंबाबोंब असताना स्वच्छता कर मात्र वसूल करण्यात येत असल्याने प्रवाशांत नाराजीचा सूर आहे.विशेष सदस्यता पॅकेज



राज्यात एसटीची १५१ आगार व ५९८ बसस्थानके आहेत. याची स्वच्छता कंत्राटी कामगारांकडून करवून घेण्यात येत आहे.दरम्यान, स्वच्छतेबाबत तक्रारी वाढल्याने आता स्वच्छतेचे काम कराच्या माध्यमांतून मिळालेल्या पैशांतून दर्जेदार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने १४ एप्रिलच्या मध्यरात्री पासून मासिक, त्रैमासिक पास धारक व सर्वसामांन्य प्रवाशांकडून प्रत्येक तिकिटांसाठी २ रुपये एसटीने प्रवास करतात. स्वच्छता कर वसूल करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्र दर्शनसाठी ५ रुपये तर विशेष कामांसाठी बस घेणाऱ्यांना एका बससाठी प्रत्येक दिवस ५० रुपये आकारण्याचे आदेश देण्यात आले आहे. राज्यात दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात.

बस प्लॅटफॉर्मवर लागण्यापूर्वी आतून बाहेरून स्वच्छत असावी, एसटी बसमधील चार्जिंग पॉइंट व इतर सुविधा या नियमित तपासल्या जाव्यात असा दंडक आहे. असे असतानाही शिवशाही असो की इतर बस असो त्यात अस्वच्छता मोठ्या प्रमाणात असते. आरामदाई शिवशाहीत तर मुंग्या आणि झुरळाचा प्रवास असतोच यात सुधारणा करण्याच्या नावाखाली स्वच्छता कराचा बोजा प्रवाशांवर टाकण्यात येत असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

***यांना मिळणार सवलत***

*स्वच्छता करातून विद्यार्थी, अहिल्याबाई होळकर पास,१४ एप्रिलच्या आगोदर तिकिट बुक करणाऱ्यांना,सवलत मिळेल.*

पान १ वरुन

### स्कूल बसचे भाडे आता सरकार ठरवणार

पूर्व-प्राथमिक ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या प्रवासादरम्यान प्रत्येक बसमध्ये महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्यांची बसमध्ये चढताना आणि उतरताना वेळेसह नोंद ठेवावी लागणार आहे तसेच विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) मुलांसाठी प्रशिक्षित कर्मचारी आणि सुलभ प्रवेश व्यवस्थेची तरतूद मसुद्यात करण्यात आली आहे.

याशिवाय चालक आणि वाहकांचे पोलीस व्हेरिफिकेशन आणि वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. हा नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत बदल न केल्यास वाहनाचा परवाना थेट रद्द होणार आहे. शिक्षण आणि परिवहन विभाग संयुक्तपणे बसेसची तपासणी करून जिल्हा समितीला अहवाल देणार आहे.

### 'इच्छांचे दीप प्रवाही' पुस्तकाचे प्रकाशन; मान्यवरांची उपस्थिती

या पुस्तकात त्यांच्या कार्याची सुरुवात, समाजासाठी केलेले विविध उपक्रम, रुग्णसेवेला दिलेले प्राधान्य तसेच रुग्णालयाच्या उभारणीपासून विस्तारापर्यंतचे महत्त्वाचे टप्पे सुलभ आणि ओघवत्या भाषेत मांडण्यात आले आहेत. यावेळी पटवर्धन रुग्णालयाच्या अधिकृत वेबसाईटचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच पटवर्धन रुग्णालयाच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे डॉ. नितीन दांडेकर, डॉ. दीपक पुरोहित, डॉ. रवींद्र इनामदार, ॲड. सुजाता चव्हाण, उदय टिळक, सुलक्षणा टिळक, दादा जोशी, उर्मिला जैन या मान्यवर मंडळींचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी हे पुस्तक वैद्यकीय, सामाजिक आणि सेवाभावी क्षेत्रातील कार्यकर्ते, तरुण पिढी तसेच सर्वसामान्य वाचकांसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, नगरसेवक अजय बहिरा, गणेश कडू, तेजस कांडपिळे, सुमित झुंझारराव, नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, कामगार नेते रवी नाईक, राजीव समेळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## डीपीएस फ्लेमिंगो लेकवर सांडपाण्याचे संकट





**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळ येथील डीपीएस फ्लेमिंगो लेकमध्ये सांडपाण्यामुळे वाढत्या प्रदूषणाचा गंभीर इशारा पर्यावरणप्रेमींनी दिला आहे. जागतिक महत्त्व असलेल्या थाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य रामसर क्षेत्रातील तीन प्रमुख जलपक्षी अधिवास धोक्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पर्यावरणवादी संघटनांनी तलावाला खाडीशी जोडणारी दक्षिणेकडील मुख्य जलवाहिनी तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. नेरुळ येथील जलवाहतूक प्रवासी टर्मिनलकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बांधकामावेळी ही वाहिनी बुजवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पाणथळ क्षेत्रांच्या पर्यावरणशास्त्राचा अभ्यास असलेल्या एका वरिष्ठ पर्यावरण वैज्ञानिकांनी तलावातील पाणी सेंद्रिय कचऱ्यामुळे विषारी बनल्याची भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे हा तलाव जलपक्ष्यांच्या खाद्य शोधण्याच्या दृष्टीने अयोग्य ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कामोठे शहराच्या एन्ट्री पॉइंटवर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगड जिल्ह्याचे प्रवेशद्वार असणाऱ्या कामोठे शहराच्या एन्ट्री पॉइंटवर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक असावे या हेतूने कामोठे शहरातील सर्व शिवप्रेमी संस्था, राजकीय प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांची दिनांक 10 एप्रिल रोजी भेट घेऊन निवेदन देण्यात आले .

तसेच भावी पीढीला छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास कळावा यासाठी महाराजांचा भव्य असा अश्वारूढ पूर्णाकृति पुतळा, भव्य प्रवेशद्वार, छत्रपती



शिवाजी महाराजांच्या स्मृतीला उजाळा देणारे भित्तीचित्रे, वस्तू संग्रहालय, शिवाजी महाराज यांच्या आयुष्यावर आधारित साहित्य, प्रशस्त उद्यान, कारंजे, ज्येष्ठ नागरिकांना बसण्याची प्रशस्त व्यवस्था, सुंदर व अत्याधुनिक लेजर लाईट्स, असे स्मारक व्हावे यासाठी यासाठी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांना या निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी नगरसेवक विकास घरत, नगरसेवक हॅप्पी सिंग, नगरसेवक डॉ अरुणकुमार भगत, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान , एक शहर एक शोभायात्रा, सकल मराठा समाज पदाधिकारी आणि अन्य शिवप्रेमी संघटना उपस्थित होत्या.

# अतिक्रमण नियमितीकरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा -आमदार महेश बालदी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन शुक्रवारी (दि. १०) रोजी पनवेल तालुक्यातील ओवळे मंडळाच्या वतीने करंजाडे-चिंचपाडा येथील काळभैरव मंदिर परिसरात करण्यात आले होते यावेळी अतिक्रमण नियमितीकरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना झालेल्या दिलासाचा उल्लेख करत आमदार महेश बालदी यांनी महसूल विभागाच्या उपक्रमाचे कौतुक केले. शासन आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांना विविध शासकीय सेवा थेट उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या कार्यक्रमास आमदार महेश बालदी, विभागीय आयुक्त, कोकण रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे, अप्पर आयुक्त कोकण वैशाली इंदाणी, उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक,तहसीलदार मीनल भोसले भामरे, नायब तहसीलदार राजश्री जोगी यांची उपस्थिती होती.

यावेळी शेतकऱ्यांना जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत लाभ, दिव्यांग लाभार्थ्यांसाठी संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पेन्शन सुरू, SIR मॅपिंगद्वारे मतदारांचे मॅपिंग, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी जातीचे दाखले वितरण, विद्यार्थ्यांना डोमेसाईल, उत्पन्न व इतर दाखले तात्काळ उपलब्ध, मोठ्या प्रमाणावर आधार कार्ड अपडेट सेवा उपलब्ध केली. या अभियानाचा लाभ अनेक लाभार्थ्यांनी घेतला.

विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी आदिवासी बांधवांसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे शासनाच्या सेवा तळागाळापर्यंत पोहोचत असल्याचे नमूद केले.जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पनवेल शहर "तिसरी मुंबई" म्हणून विकसित होत असून अशा शिबिरांमुळे नागरिकांना सुलभ व तत्काळ सेवा मिळत असल्याचे सांगितले. ओवळे मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महाराजस्व समाधान शिबिराचे सुयोग्य नियोजन व अंमलबजावणीबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

यावेळी सदाशिव वास्कर, रंजना वास्कर, मंगेश शेलार, सोनाली जितेकर, मनीषा जितेकर, रुपेश गायकवाड, समाधान घोपरकर, गणेश कडू, दर्शना भोईर, रत्नप्रभा घरत, गजानन पाटील व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**पनवेल : गव्हाण येथील शांतादेवी यात्रेला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी सपत्नीक भेट देऊन दर्शन घेतले. आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.**



**पनवेल : थोर समाजसेवक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती भाजपच्या वतीने पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले.**

## उलवेतील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम शनिवार दिनांक 11 एप्रिल रोजी संपन्न झाला



विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांनी प्रतिमेचे पूजन केले. शैक्षणिक कार्याचा आढावा विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून विशद केला सांस्कृतिक विभागप्रमुख भारती म्हात्रे यांनी ज्योतिबा आणि सावित्रीबाई यांचे कार्य समाजाला किती प्रेरणादायी आहे हे मौलिक शब्दात मांडले समतेच्या तीरावरती ममतेचे मंदिर बांधून सामाजिक न्यायाचा मंत्र जपणारे ज्योतिबा फुले बागकाम करणाऱ्या माळ्याचा मुलगा पण केवळ समाजाची अधोगती प्रशिक्षितपणामुळे झालेली आहे हे त्यांनी ओळखले आणि शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचवण्याचे त्यांना मोलाची साथ सावित्रीबाई फुले यांनी दिली.

आज समाजामध्ये स्त्रिया सन्मानाने स्वावलंबी जीवन जगत आहेत त्यामध्ये फुले दांपत्याचे योगदान फार मोठे आहे सुखी संपन्न कौटुंबिक स्थिती असताना केवळ समाजासाठी हाल अपेष्ठा सोसल्या प्रसंगी हे कार्य करीत असताना घरच्यांनी घराबाहेर काढले जंगपेठेत भाड्याने राहण्याची वेळ आली पण आपल्या ध्येयापासून ज्योतिबा विचलित झाले नाहीत आज त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्याचा दिवस आहे विद्ये विना मती गेली मतीविना गती गेली गतीविना वित्त गेले समाज खचला अवघे अनर्थ एका व्यक्तीने केले ज्योतिबांच्या या दूरदृष्टीला आणि सावित्रीबाईंच्या कार्याला क्रांती सूर्याला आणि क्रांतीज्योतीला विनम्र अभिवादन अशा प्रकारचे विचार अध्यक्ष भाषणातून मुख्याध्यापकांनी व्यक्त केले विद्यालयाचे धनाजी पाटील यांनी आभार मानले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेदांगी म्हात्रे पाटील यांनी सहकार्य केले

## विसपुते महाविद्यालयात शिक्षक भरती कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्ह यशस्वी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शैक्षणिक समूह संचलित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज, न्यू पनवेल येथे इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राइव्हला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रायगड व नवी मुंबई परिसरातील 50 शाळांसाठी ही शिक्षक भरती मोहीम अत्यंत उपयुक्त ठरली,



या भरती मेळाव्यात बी.एड., एम.एड., डी.एड. पात्रता असलेल्या शिक्षकांसह आर्ट व प्री-प्रायमरी शिक्षकांनाही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली. एकूण 337 पात्र उमेदवारांनी विविध नामांकित शाळांमध्ये मुलाखती दिल्या, त्यापैकी 65 हून अधिक उमेदवारांची निवड झाली, ही या उपक्रमाची यशस्वी फलश्रुती ठरली.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी संवादातून नवीन शैक्षणिक धोरण (NEP) आणि कौशल्य विकास यांचा परस्पर संबंध अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट केला. आजच्या स्पर्धात्मक युगात नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्वतःच्या अंगी असलेल्या कौशल्यांचा योग्य वापर करून कार्यक्षमतेची उंची कशी गाठावी, याबाबत उपस्थितांना नवी दिशा दिली.

या उपक्रमाबाबत रामकृष्ण अकॅडमीचे प्राचार्य दीपक तावडे यांनी "होऊ घातलेल्या शिक्षकांसाठी ही एक नवी पर्वणी ठरली" असे मत व्यक्त केले.

या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विनायक लोहार, डॉ. प्रितेश वाडे, प्रा. निलेश आडसुळे, प्रा. राजू गायकवाड, जाई जगताप, मंगेश शेवते इतर शिक्षकेतर कर्मचार्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम केवळ भरती मेळावा नसून, नव्या शिक्षकांच्या स्वप्नांना दिशा देणारा एक प्रेरणादायी सोहळा ठरला.

## कोप्रोली येथे महाराजस्व समाधान शिबिरात विविध दाखल्यांचे वाटप



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कोप्रोली येथील आई एकविरा सभागृहात १० एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमात एकूण ९० लाभार्थ्यांना सातबारा व ४२ लाभार्थ्यांना ८ अ वाटप २२ फेरफार निकाली १२ सातबारा दुरुस्ती १५ लाभार्थ्यांना संजय गांधी योजना प्रमाणपत्र ३० लाभार्थ्यांना उत्पनाचे दाखले वाटप करण्यात आले. तर १४ लाभार्थ्यांची ॲग्री स्टॅग नोंदणी करण्यात आली.

सदर शिबिराचे अध्यक्ष उरण तालुक्याचे तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून प्रारंभ करण्यात आला. या शिबिरास उरण तालुक्यातील महसूल विभाग अंतर्गत विविध प्रकारचे दाखले व नवीन योजना शासन निर्णय याबाबतची माहिती उपस्थित जनसमुदायास उरणचे तहसीलदार तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली. तसेच उपस्थित जनसमुदायास सदर कार्यक्रमांतर्गत आपत्कालीन परिस्थिती व प्रथमोपचार याबाबत मनोहर म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार रविंद्र सानप नायब तहसीलदार नरेश पेडवी तालुका कृषीअधिकारी ऋतुजा ननावरे,जिल्हा आपत्ती व्यवस्थापक समन्वय अधिकारी मनोहर म्हात्रे जिल्हा परिषद सदस्य अविनाश ठाकुर, पंचायत समिती सदस्या कविता पाटील श्री.विश्वास म्हात्रे माझी पंचायत समिती सभापती विश्वास म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र ठाकूर, जीवन गावंड कोप्रोलीचे मंडळ अधिकारी के.डी.मोहिते मंडळ अधिकारी कोप्रोली ग्राम महसूल अधिकारी भाऊ पिरकर, जयहिंद कोळी, संभाजी खुस्पे, सुभाष पवार, निखिल वाइंगडे,अमोल बोराटे व महसूल सेवक नथुराम कातकरी, आदेश गावंड, श्रीम नंदिनी या कार्यक्रमास उपस्थित होते.

## सीकेटी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार आणि विद्वान कायदेतज्ञ होते. त्यांनी संविधानाद्वारे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा पाया रचला, संविधानाच्या ७५ व्या वर्षाचे औचित्य साधून तथा सन २०२६ मधील संत गाडगे महाराजांची १५० वी जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष असल्याने, सर्वसामान्य जनतेपर्यंत या महनीय व्यक्तिमत्वांची ख्याती, कीर्ती आणि कार्य पोहोचविण्यासाठी ०८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ हा कालावधी "सामाजिक समता सप्ताह" म्हणून साजरा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनामार्फत घेण्यात आला.



याच पार्श्वभूमीवर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) चे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित सप्ताहाच्या यथोचित आयोजनासाठी महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे सहयोगी प्राध्यापक तथा कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार यांच्या अध्यक्षतेखाली "सामाजिक समता सप्ताह समिती" चे गठन करण्यात आले. सदर समितीच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांमध्ये समता, न्याय आणि बंधुत्व या मूल्यांचे रोपण करण्यासाठी समितीने दि. ०९ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत बहुविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

प्रस्तुत उपक्रमांच्या श्रुंखलेचा एक भाग म्हणून गुरुवार, दि.०९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०९.३० वाजता सामाजिक समता सप्ताह समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार यांच्या नेतृत्वाखाली समितीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित लघुपट आणि चवदार तळे सत्याग्रह यांवरील माहितीपटाच्या माध्यमातून उपस्थित विद्यार्थ्यांना सामाजिक समता आणि जातीय सलोख्याचा संदेश देण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या विविध विद्याशाखांचे विद्यार्थी आणि आयोजन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

संत गाडगे महाराजांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा जागर आणि त्यांना अभिवादन करण्यासाठी महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभागाने शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०८.३० वाजता लेफ्टनंट प्रा. नीलिमा तीदार आणि सी.टी.ओ. प्रा. सागर व्यवहारे यांच्या नेतृत्वाखाली, एन.सी.सी. विषयक पायाभूत अध्ययन विषयाचे समन्वयक प्रा. साहिल पाटील यांच्या उपस्थितीत एन.सी.सी. कॅडेट्स तथा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी खांदेश्वर तलाव परिसरात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करत पर्यावरण संधारण आणि स्वच्छतेतून समृद्धतेकडे जाण्याचा संदेश दिला.

यांनतर थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयाच्या चर्चासत्र सभागृहात महात्मा फुलेंच्या समताविषयक विचारांबाबत जनजागृती करण्यासाठी वसईच्या ए.व्ही. कॉलेज ऑफ आर्ट्स च्या इंग्रजी विभागाचे प्राध्यापक प्रो. डॉ. विजयानंद बनसोडे यांनी सर्व उपस्थितांना संबोधित करताना महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी घेतलेले अथक परिश्रम, समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा यांविषयी भाष्य केले आणि खऱ्या अर्थाने महात्मा फुले हेच आधुनिक भारताचे शिल्पकार असल्याचे प्रतिपादन केले.

सामाजिक समता सप्ताहाचा भाग म्हणून महाविद्यालयाच्या प्रस्तुत समितीने दि. १३ आणि १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शन ग्रंथालय विभागामध्ये, ग्रंथपाल डॉ. रमाकांत नवघरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केले आहे. याबरोबरच महाविद्यालयात १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता डॉ. प्रमोद बळवंत भोसले, राज्यकर उपायुक्त (ठाणे-१) यांचे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि चवदार तळे सत्याग्रह" याविषयावरील अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. सामाजिक समता सप्ताहाची सांगता सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकाऱ्यांच्या उपस्थितीत मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजन आणि जयंती उत्सवाने होणार असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी उधृत केले.

सदर सप्ताहाच्या आयोजनासाठी महाविद्यायाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो.डॉ. बी.डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक समता सप्ताह समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र परमार, उपाध्यक्ष डॉ. सुर्यकांत परकाळे, सदस्य-सचिव प्रा. आकाश पाटील, सदस्य प्रा. आलोक भानुशाली, प्रा. सुशीलकुमार घाडगे, डॉ. भाग्यश्री भोईर, प्रा. गणेश जगताप, प्रा. हरिभाऊ खरात, प्रा. रुपाली पाटील, प्रा. रुपेश माने आदी विशेष परिश्रम घेत आहेत.

## कोल्ड्रिंकच्या टिनमध्ये नाग शिरला; सर्पमित्राने दिले जीवदान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील पोयंजे येथे एका कोल्ड्रिंकच्या डब्यात एक नाग शिरल्याने या नागाला बाहेर येणे शक्य नव्हते. भिंगार येथील सर्पमित्र यांनी वेळेवर पोहचून या नागाला अत्यंत कौशल्याने बाहेर काढून त्याला जीवदान दिले.



मयूर मुंडे यांना त्यांच्या घराशेजारी फेरफटका मारत असताना कोल्ड्रिंकच्या डब्यात सापाचे डोके दिसल्याने त्यांनी तातडीने याची माहिती सर्पमित्रांना दिली. माहिती मिळताच सर्पमित्र प्रतिक शेंद्रे हे आपले सहकारी अक्षय लबडे यांच्यासह घटनास्थळी दाखल झाले. सुमारे अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनंतर नागाला कोणत्याही प्रकारची इजा न होता सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले. या नागाला मानवी वस्तीपासून दूर सुरक्षित अशा नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. साप हे शेतकऱ्यांचे मित्र आहेत, त्यांना मारू नका," असे आवाहन यावेळी सर्पमित्रांनी केले.

# ‘नेहले पे देहला’ @ ५० वर्षे

## पडद्यामागच्या गोष्टी जास्त रंजक





सुनील दत्तच्या वांद्र्यातील पाली हिलवरील अजंठा बंगल्यातील तळघरात असलेल्या मिनी थिएटरमध्ये एखादा चित्रपट अथवा गाणी पाहायला जाताना कायमच दिलीपकुमारच्या बंगल्यावर नजर पडायचीच. मीडियात असल्यानेच हा एक वेगळाच अनुभव. दिलीपकुमार आणि सुनील दत्त हे सख्खे शेजारी. ते कधीच कोणत्याही चित्रपटात एकत्र आले नाहीत, पण सुनील दत्त आणि सायरा बानू यांनी नायक नायिका साकारली आणि त्यात एक चित्रपट होता ‘नेहले पे देहला’. मुंबईत हा चित्रपट २ एप्रिल १९७६ रोजी प्रदर्शित झाला, म्हणजेच या चित्रपटाच्या प्रदर्शनाला पन्नास वर्षे पूर्ण झाली.

मुंबईत या चित्रपटाचे मुख्य चित्रपटगृह शालिमार होते. हा गुन्हेगारीपट अगदीच साधारण मसालेदार मनोरंजक होता (म्हणाली तशी भट्टी जमली नव्हती) म्हणून चित्रपट रसिकांनीही त्याला तेवढेच साधारण स्वरुपाचे यश दिले. प्रेक्षक उगाच एखाद्या चित्रपटासाठी वेळ, पैसा आणि येण्या-जाण्यासाठी शक्ती खर्च करत नाहीत. अजंठा आर्ट्स या आपल्या बॅनरखाली सुनील दत्त यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आणि दिग्दर्शन राज खोसला यांचे आहे.

सुनील दत्तने आपल्या या चित्रपटाचे काही दिवसांचे चित्रीकरण आपल्या बंगल्याच्या पहिल्या मजल्यावरील प्रशस्त हॉलमध्ये करायचं ठरवलं. सगळेच फिल्मवाले चित्रपट निर्मितीत पैशाची उधळपट्टी करत नाहीत. सायरा बानूला तर आपल्या बंगल्याजवळच हे चित्रीकरण असल्याने अधिक आनंद. आपल्या बंगल्याच्या तिसऱ्या मजल्यावरून सुनील दत्तच्या पहिल्या मजल्यावरील चित्रीकरण दिसत असल्याने तिने आपल्या घरातूनच मेकअप करून जायचं ठरवलं. तसं ती करे आणि सुनील दत्तने आपल्या प्रॉडक्शनमधील एकाला वेगळीच कामगिरी दिली. दिग्दर्शक राज खोसला यांनी ' मॅडम को बुलाव, शॉट रेडी है' असं म्हणताच तो प्रॉडक्शन बॉय शिट्टी वाजवून सायरा बानूला सेटवर बोलवत असे. साधारण आठवडाभर हे चित्रीकरण होत असताना हे शिट्टी वाजवणे झाले. हे पाहून दिलीपकुमारने सुनील दत्तला म्हटले, असं हे शिट्टी वाजवून सायराना सेटवर बोलावण्यापेक्षा आपण दोघांच्या घराला जोडणारा एक पूल बांधूयात. हे ऐकून सुनील दत्त आणि सायरा बानू मनापासून हसले.

ही अतिशय वेगळी अशी गोष्ट, सुनील दत्तच्या २००४च्या जन्मदिनानिमित्त सोशल मीडियात पोस्ट केली. केवढा एक्सलुझिव्ह किस्सा बघा.( सोशल मीडियावर अशा अनेक एक्सुझिव्हज आठवणी, गोष्टी, किस्से असतात ही एक जमेची बाजू) सुनील दत्तच्या निधनानंतर संजय दत्तने अजंठा बंगला आणि त्यातील मिनी थिएटर, एडिटिंग रुम हे सगळे पाडून त्या जागी नवीन चकाचक आधुनिक शैलीची इमारत उभारली आहे. काळ बदलला, हेतू बदलले. जगणं बदललं.

आपण एकत्र काम करावं असं अगदी साठच्या दशकात सुनील दत्त आणि सायरा बानू यांना वाटत होतं, पण तेव्हा दक्षिणेकडील काही चित्रपटांसाठी (खानदान, मिलन वगैरे) तशी ऑफरही होती. सुनील दत्तचे म्हणणे होते, एखाद्या प्रेमकथेसाठी आपण एकत्र येऊयात. सायरा बानू त्या काळातील एक सौंदर्यवान अभिनेत्री म्हणून ओळखल्या जात (राजेंद्रकुमार सायरा बानूकडे आकर्षित झाला आहे असे गॉसिप्स मॅगझिनमधून केवढे तरी पिकवले, शिजवले गेले) ज्योती स्वरूप दिग्दर्शित ‘पडोसन’ (१९६८) या भन्नाट विनोदीपटात सुनील दत्त आणि सायरा बानू पहिल्यांदाच एकत्र आले. पिक्चर सुपर डुपर हिट ठरला. कधीही पहावा झक्कास टाईमपास.

### झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

‘नेहले पे देहला’बद्दल काय सांगू? दिग्दर्शक राज खोसला माझ्या अतिशय आवडत्या दिग्दर्शकातील एक. त्यांच्या ‘नकाब’ (१९८४) या चित्रपटाच्या निमित्ताने वांद्र्यातील पाली हिलवरील निवासस्थानी मुलाखतीसाठी भेटलो असता त्यांनी दिग्दर्शित केलेल्या अनेक जुन्या चित्रपटांच्या चित्रीकरणाच्या वेळच्या गोष्टी सांगितल्या. त्यात ‘नेहले पे देहला’बद्दल बोलण्यासारखे काहीही नव्हते. सत्तरच्या दशकातील एक हुकमी फॉर्मुला म्हणजे मा बाप के खून का बदला आणि चित्रपटाच्या पहिल्या रिळात लहानपणी हरवलेले दोन भाऊ मोठे झाल्यावर चित्रपटाच्या क्लायमॅक्सला भेटणे आणि आपल्या आई वडिलांच्या खुनाचा बदला घेताना खलनायकाची धुलाई करणे. चित्रपटाची सुरुवात आणि शेवट यांच्या दरम्यानचा मनोरंजनाचा खचाखच मसाला म्हणजे पिक्चर असे सरळ साधे गणित होते. ते जमलं की पब्लिक खुश आणि जर गणित फसलं तर पब्लिक नाराज. असा एकदम सिधा हिसाब. या चित्रपटाची मनोरंजनाची खिचडी जास्त शिजली नाही. खौपनाक खलनायक (प्रेमनाथ) एका प्रकरणात एक खून करतो, त्यात दोन लहान भाऊ हरवतात. त्यातला एक राम (सुनील दत्त) आणि दुसरा रहिम (विनोद खन्ना) भिन्न धर्मामध्ये लहानाचे मोठे होतात. हे बरे असते. सर्वधर्मसमभाव साधता येतो. रामची प्रेयसी बीना (सायरा बानू). या चित्रपटात बिंदू, रणजित, त्रिलोक कपूर, देव कुमार, ओम प्रकाश, अन्वर हुसेन, कामिनी कौशल, भारत भूषण इत्यादींच्याही भूमिका. राहुल देव बर्मनच्या संगीतातील सावन का महिना आ गया हे गाणे बरं होते.

आश्चर्य वाटले ते दिग्दर्शक राज खोसला यांचे. खरंतर गुरूदत्तच्या दर्जाचा दिग्दर्शक. गुरूदत्त दिग्दर्शक आणि अभिनेताही. जास्त कौतुक वाट्याला आले. तशी गुणवत्ताही होती. राज खोसला यांनी दिग्दर्शित केलेल्या सीआयडी (१९५६), काला पानी (१९५८), सोलवा साल (१९५८), एक मुसाफिर एक हसिना (१९६२), वो कौन थी (१९६५), मेरा साया (१९६६), दो बदन (१९६६), दो रास्ते (१९६९), मेरा गाव मेरा देश (१९७१), कच्चे धागे (१९७३), प्रेम कहानी (१९७५), मै तुलसी तेरे आंगन की (१९७८), दोस्ताना (१९८०) हे चित्रपट विषयातील केवढी तरी विविधता दाखवताहेत. (याशिवाय त्यांचे शरीफ बदमाश वगैरे चित्रपट जमले नव्हते.) एकच दिग्दर्शक रहस्यमय, भयपट, गुन्हेगारीपट, सामाजिक चित्रपट, डाकूपट, प्रेम त्रिकोण अशी केवढी तरी विविधता दाखवतो आणि या प्रत्येक चित्रपटातील गाण्यांचे टेकिंग अप्रतिम. ‘नेहले पे देहला’मध्ये राज खोसलाचा टच दिसला नाही. निर्माता म्हणून सुनील दत्तही विशेष कारागिरी करण्यात अपयशी. अन्यथा अजंठा आर्ट्स या बॅनरखाली मोनी भट्टाचार्य दिग्दर्शित मुझे जीने दो, सुनील दत्त दिग्दर्शित यादे (हा एकपात्री चित्रपट आहे), रेश्मा और शेरा असे दर्जेदार चित्रपट निर्माण केले. नेहले पे देहला सत्तरच्या दशकातील ठोकळेबाज आणि नियोजनाचा अभाव असलेला चित्रपट वाटला. मुंबईत शालिमार चित्रपटगृहात तरीही शंभर दिवसांचे यश प्राप्त केले. हे आश्चर्यच. त्या काळातील चित्रपट रसिकांच्या माफक अपेक्षा असत आणि या चित्रपटातील कलाकार लोकप्रिय होते. तेवढेही पुरेसं होतं. आवडत्या कलाकाराला पडद्यावर पाहण्यासाठी किमान एकदा तरी चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणारे फिल्म दीवाने होते. प्रेम प्रेम प्रेम म्हणतात ते हेच.

नेहले पे देहलाच्या बरोबरच (म्हणजे शुक्रवार दिनांक २ एप्रिल १९७६ रोजी) प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित ‘बारुद’ ( ऋषि कपूर आणि शोमा आनंद) आणि एस. रामनाथन दिग्दर्शित ‘सबसे बडा रुपय्या’ (मेहमूद, विनोद मेहरा, मौशमी चटर्जी आणि फरिदा जलाल) हेही चित्रपट प्रदर्शित झाले आणि त्यांच्या प्रदर्शनासही पन्नास वर्षे पूर्ण झाली. पण हे चित्रपट प्रदर्शित होत असताना रमेश सिप्पी दिग्दर्शित ‘शोले’(१९७५)ची अक्राळविक्राळ क्रेझ जराही कमी झाली नव्हती. त्या वातावरणात टिकून राहण्यासाठी पिक्चरही तसा सॉलीड हवा होता...

# कायदे मंडळात महिलांच्या सहभागासाठी ‘नारी शक्ती वंदन’ अधिनियम

विविधतेने नटलेला भारतदेश हे या देशाचे बलस्थान आहे.या देशाची युवा शक्ती आणि महिला शक्तीही खास वैशिष्टय आहे. स्टार्टअप्सच्या माध्यमातून युवकांनी उद्योगांची धुरा सांभाळत आर्थिक आघाडीवर पुढाकार घेतला तसाच तो महिलांनीही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महिला शक्तीचे महत्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या प्रगतीला अधिक चालना देण्यासाठी व २०४७मध्ये विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महिलांचे योगदान व सहभाग वाढविण्याकरिता केंद्र शासनाने संसदेत ‘नारी शक्ती अधिनियम’ पारित केला. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने त्याचे विधेयकात रुपांतर झाले आहे.

येत्या काळात संसद आणि राज्यांच्या विधिमंडळात महिलांना ३३ टक्के प्रतिनिधीत्व मिळण्याच्या प्रक्रियेची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने चर्चा व सर्वानुमते त्यावर शिक्कामोर्तब होण्याकरिता १६ ते १८ एप्रिलदरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलविण्यात आले आहे. या अधिवेशनात नारी शक्ती अधिनीयमावर चर्चा होणार आहे. तेव्हा हा अधिनियम नेमका काय आहे त्यावर प्रकाश टाकणारा हा लेख ..

संसदेच्या दोन्ही सभागृहांद्वारे राज्यघटनेच्या १२८व्या संशोधनाद्वारे पारीत विधेयकाचे राज्यघटनेच्या अनुच्छेद १११ नुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीने २८ सप्टेंबर २०२३ रोजी नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३चे ऐतिहासिक व महत्वपूर्ण कायद्यात रुपांतर झाले. तत्पूर्वी, हे विधेयक १९ सप्टेंबर २०२३ रोजी संसदेचे कनिष्ठ सभागृह लोकसभेत तर २१ सप्टेंबर २०२३ रोजी वरिष्ठ सभागृह राज्यसभेत मंजूर झाले. आता या अधिनीयमास राज्य घटनेचे १०६ संशोधन म्हणून अधिकृत मान्यता मिळाली आहे.

लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के प्रतिनिधीत्व मिळवून देणारे नारी शक्ती वंदन हे विधेयक संसदेच्या नवीन इमारतीत पारीत झालेले पहिले विधेयक ठरले हे ही वेशिष्टयपूर्ण आहे. म्हणजे नवीन संसदेतील विधेयक मंजुरीची सुरुवातच मुळात महिला सक्षमीकरणाच्या निर्णयाने झाली आहे. विशेष करून या विधेयकामुळे आदीपासून अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागा आता या आरक्षणाअंतर्गत येणार आहेत.या विधेयकाला राज्यांच्या मंजुरीची आवश्यकता नाही, कारण त्यामुळे संसदेतील राज्यांच्या जागांच्या मूळ संख्येत बदल होत नाही त्यामुळे संसदेतील राज्यांच्या प्रतिनिधित्वावर कोणताही परिणाम होणार नाही.



**विधेयकाच्या इतिहासावर एक नजर**

संसदेत १९९३मध्ये पारीत राज्य घटनेच्या ७३व्या आणि ७४ व्या दुरुस्तीनुसार ग्रामपंचायती आणि नगर पालिकांचा समावेश करण्यात आला.तसेच या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ (एक तृतियांश) जागा आरक्षीत करण्यात आल्या, मात्र राज्यघटनेत लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेतील महिलांच्या आरक्षणाबद्दल कोणतीही तरतूद करण्यात आली नव्हती, पण राज्यघटनेत दुरुस्तीकरून महिलांना संसद आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात अनुक्रमे वर्ष १९९६,१९९८,१९९९ आणि २००८मध्ये संसदेत विधेयके मांडण्यात आली.

एच.डी. देवेगौडा देशाचे पंतप्रधान असतांना १९९६मध्ये केंद्र शासनाने पहिल्यांदा महिला आरक्षण विधेयक संसदेत मांडले होते. पुढे सीमा मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे हे विधेयक सोपविण्यात आले. समितीने आपला अहवालही दिला, मात्र संसदेत तो अहवाल आला नाही. पुढे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने संसदेत हे विधेयक मांडले, पण ते मंजूर झाले नाही. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वात केंद्र शासनाने २००८मध्ये राज्यसभेत हे विधेयक मांडले, मात्र लोकसभेत ते मंजूर झाले नाही. या तिन्ही विधेयकांचा पुढील प्रवास लोकसभा भंग झाल्याने तिथेच थांबला. संसदेच्या संयुक्त समितीने १९९६मध्ये या विधेयकाची समिक्षा केली तर २००८च्या विधेयकाची समिक्षा कार्मिक , जनतक्रार, कायदे आणि न्याय संबंधी स्थायी समितीने केली. या दोन्ही समित्यांनी महिलांसाठी जागा आरक्षित ठेवण्याच्या प्रस्तावास सहमती दर्शविली. या समित्यांनी काही शिफारसीही केल्या.

**महिलांचा सहभाग**

वर्तमानात १७व्या लोकसभेत एकूण सदस्यांपैकी महिलांचा सहभाग पाहता १५ टक्के, तर राज्य विधानसभांमध्ये सरासरी ९ टक्के एवढा आहे. तत्पूर्वी २०१५मध्ये कायदेमंडळात महिलांच्या प्रतिनिधीत्वाबाबत एक वास्तवदर्शी अहवाल प्रकाशित झाला त्यात महिलांच्या प्रतिनिधीत्वाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. आणि देशातील सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येत स्थानिक स्वराज्य संस्थेसह संसद, राज्य विधानसभा आणि मंत्रिमंडळामध्ये महिलांना कमित कमी ५० टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली होती. तत्पूर्वी, २००१मध्ये राष्ट्रीय महिला सशक्तीकरण धोरणामध्ये सांगण्यात आले होते की उच्चस्तरीय कायदेमंडळात महिलांच्या आरक्षणाबाबत विचार करण्यात यावा.


**अधिनियमाची वैशिष्ट्ये**

संसदेने पारीत केलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियमानुसार लोकसभा,राज्यसभा आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली विधानसभेत शक्य तेंव्हा एक तृतियांश जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात यावे असे नमूद आहे. हाच अधिनियम लोकसभा,राज्यसभा आणि राज्यांच्या विधानसभांमधील अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांसाठी राखीव जागांनाही लागू राहणार आहे. या अधिनियमानुसार अनुच्छेद ३३० (ए) मध्ये संशोधन करून केंद्रीय कायदेमंडळ तर अनुच्छेद ३३२ (ए) मध्ये संशोधन करून राज्यांच्या कायदेमंडळात आणि अनुच्छेद २३९ ए ए (२) (बी) नुसार राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली मध्ये महिला आरक्षणाची तरतूद करण्यात आली. यावर्षी सुरु झालेल्या राष्ट्रीय जनगणनेतील आकडयांचा आधार मानून हे आरक्षण प्रत्यक्षात येणार आहे. त्या नुसारच मतदार संघांचे परिसीमन आणि जागांचे चक्राकार पद्धतीने निश्चिती होणार आहे.

कुटुंबरुपी रथाच्या दोन चाकांपैकी पुरुषांच्या बरोबरीने महिलांना भारतीय कुटुंब व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. यापुढेही त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी केंद्र व राज्य शासनांनी विविध योजनांच्या माध्यमातून महिला विकासासाठी जोरकसपणे प्रयत्न केले आहेत. परिणामी संरक्षण, उद्योग, शिक्षण, कृषी, समाजकारण, राजकाराण, आर्थिक, वैद्यकीय, प्रशासन आदी क्षेत्रांमध्ये महिलांनी आपल्या कर्तृत्वाची छाप सोडली आहे. आता देशात नारी शक्ती वंदन अधिनियमाच्या माध्यमातून महिलांचा कायदेमंडळातही सहभाग व योगदान वाढणार आहे व विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यात महिलांची महत्वाची भूमिका ठरणार आहे.

**–रितेश भुयार**
**माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क, नागपूर**

# लेखक, अनुवादक वासुदेव आपटे



वासुदेव गोविंद आपटे हे निबंधकार, कोशकार, अनुवादक आणि बालवाङ्मयकार होते. ‘वाल्मीकीचा जय’ ही कादंबरी त्यांनी बंगालीतून मराठीत अनुवादित केली. आज वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगावात १२ एप्रिल १८७१ रोजी झाला. बालवाङ्मयाचे लेखक, बालमासिकाचे संपादक, निबंधकार, कोशकार, टीकाकार, अनुवादक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांचे माध्यमिक शिक्षण धुळे येथे, तर उच्चशिक्षण इंदूर व नागपूर येथे झाले. १८९३ मध्ये त्यांनी कोलकाता विद्यापीठाची बी.ए. पदवी संपादन केली. त्यानंतर पुण्यातून नूतन मराठी विद्यालयात ते शिक्षक म्हणून रुजू झाले.

कोलकाता विद्यापीठातून पदवी घेत असताना त्यांचा संबंध बंगाली भाषेशी आला. भाषाभ्यासाची आवड असल्याने बंगाली भाषा शिकून त्यावर प्रभूत्व मिळविले. त्याशिवाय हिंदी, गुजराती, कानडी, तेलगू, तमीळ इत्यादी प्रादेशिक भाषाही त्यांना अवगत होत्या. उर्दू, फ्रेंच, पाली इत्यादी अन्य भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. मराठी तर त्यांची मातृभाषा. त्यामुळे या सर्व भाषाभ्यासाचा उपयोग त्यांना त्यांच्या लेखनात, अध्ययनात व अध्यापनात झाला. चरितार्थानिमित्त त्यांची मुंबई, इंदूर, अलाहाबाद, पुणे पुन्हा इंदूर अशी भ्रमंती चालू होती. इंदूरच्या राणीसाहेबांच्या आमंत्रणावरून राजकन्यांचे शिक्षक म्हणून त्यांनी काही वर्षे अलाहाबाद येथे वास्तव्य केले. तेथे त्यांचा ‘मॉडर्न रिव्ह्यू’चे संपादक रामानंद चटोपाध्याय यांच्याशी परिचय झाला आणि त्यांचा सांगण्यावरून वा. गो. आपटे यांनी त्यांच्या ‘मॉडर्न रिव्ह्यू’ पत्रात मराठी पुस्तकांवर परीक्षणे लिहिली.

बंगाली भाषेचा आणि बंगाली ग्रंथांचा अभ्यास असल्याने बंकिमचंद्र चटर्जी यांच्या ऐतिहासिक, अद्भुतरम्य, सामाजिक कादंबर्यांचे अनुवाद त्यांनी केले. वा.गो. आपटे यांनी भाषांतरित, रूपांतरित कादंबऱ्यांच्या प्रवाहाला चालना देण्याचे महत्त्वाचे काम केले. भाषाभ्यासाची विविध अंगे लक्षात घेऊन कोशसदृश पुस्तकांचे लेखनही त्यांनी केले. ‘बंगाली-मराठी कोश’ आणि ‘मराठी-बंगाली शिक्षक’ हे ग्रंथ लिहिले. ‘मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी’ (१९१०) हा महत्त्वाचा ग्रंथ त्यांनी लिहिला. ‘जैनधर्म’ (१९०४) आणि ‘बौद्धपर्व’ अथवा ‘बौद्धधर्माचा साद्यंत इतिहास’ (१९१४) हे ग्रंथ लिहिले. ‘ज्ञानदीप’, ‘भारतकन्या’ ही पुस्तकेही लिहिली. एकूण चोवीसच्यावर ग्रंथ त्यांनी लिहिले.

वा. गो. आपटे यांनी १९१० मध्ये चंद्रावती महिला विद्यालय, इंदूर येथे नोकरी केली. या काळात इंदूर सरकारने ‘मल्हारीमार्तंड’ ह्या पत्राचे संपादकत्व त्यांना दिले. पाच वर्षे त्यांनी ते काम केले. याशिवाय ‘ज्ञानप्रकाश’चे संपादकपद तसेच ‘विचारसाधना’चे संपादकपदही काही काळ संभाळले. संपादक, कोशकार, अनुवादक, लेखक असा साहित्याच्या सर्वांगाला स्पर्श करत असताना त्यांच्या बालवाङ्मयविषयक कार्यामुळे ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचले. बालसाहित्यासाठीचे त्यांचे योगदान लक्षणीय आहे. १९०६ मध्ये वा.गो. आपटे यांनी ‘आनंद’ हे मासिक मुलांकरिता सुरू केले. ते आजही नियमितपणे चालू आहे. ‘आनंद’ मासिकाव्यतिरिक्त इतर बालवाङ्मय त्यांनी लिहिले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेचा पहिला मसुदा वा.गो. आपटे यांनी लिहिला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या आद्य चिटणिसांपैकी ते एक होते. त्यांनी दहा वर्षे चिटणीसपद भूषविले. २ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांचे निधन झाले.

**–डॉ. रजनी अपसिंगेकर**


# सुप्रसिद्ध साहित्यिक पु.भा. भावे

मराठीतीस एक अष्टपैलू व प्रतिभासंपन्न लेखक म्हणून पु.भा. भावे यांची ओळख राहिली आहे. आज त्यांची जयंती...

कथा, कादंबरी, नाटक, ललित गद्य, व्यक्तिचित्र, चिंतनात्मक लेख, चित्रपटकथा, प्रवासवर्णन इ. विविध साहित्यप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले. धुळे येथे त्यांचा जन्म १२ एप्रिल १९१० रोजी झाला. प्रथमपुरूषी एकवचनी (१९८०) हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध असून त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण कशी झाली, हे समजून घेण्याच्या दृष्टीने ते अत्यंत उपयुक्त आहे. लेखन हा भाव्यांचा जीवनव्यापी व्यवसाय होता. वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी त्यांनी ‘ओम् फस’ ही कथा लिहिली व आपल्या लेखनतपस्येचा श्रीगणेशा केला. त्यांची लेखनतपस्या आमरण टिकून होती. भाव्यांचे संस्कारक्षम बालपण विदर्भात गेले व नागपूरला त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास झाला. संपन्न घराण्यात जन्मास येऊनही जीवनातील खडतर अनुभव त्यांना घ्यावे लागले. वाचनाचे भाव्यांना विलक्षण वेड होते. या वाचनामुळेच त्यंच्यातील वाङ्मयाभिरूचीचे पोषण झाले.

किर्लोस्कर खबरमध्ये (जुलै १९३१) त्यांची ‘फुकट’ ही कथा प्रकशित झाली. तथापि त्यांचे लेखणीचे व प्रतिभेचे सामर्थ्य प्रगट झाले ते त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनामुळे. हिंदुत्वनिष्ठ विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या नागपूरच्या सावधान या साप्तहिकातून त्यांचे लेख प्रसिद्ध होताच (१९३६) त्यांतून प्रगट होणाऱ्या भाषासौंदर्याने व तेजस्वीपणाने वाचक मुग्ध होऊन गेले. अच्युत बळवंत कोल्हटकर व शिवराम महादेव परांजपे ह्या दोन प्रसिद्ध शैलीकार साहित्यिकांच्या लेखनगुणांचे मनोज्ञ रसायन भावांच्या शैलीतून प्रगट झाले. आदेश (१९४१-४८) या त्यांच्या स्वतःच्या साप्ताहिकातूनही त्यांचे अनेक चित्तवेधक लेख प्रसिद्ध झाले आहेत. मूलतःप्रचारी स्वरूपाचे स्वरूपाचे असूनही त्यांचे अनेक लेख वाङ्मयगुणांनी मंडित झालेले दिसतात. त्याचे कारण भाव्यांची विशिष्ट लेखनशैली हेच होय. रक्त आणि अश्रू (१९४२) हा त्यांचा लेखसंग्रह केवळ त्यांच्याच नव्हे, तर एकूण मराठी निबंधवाङ्मयाताही अद्विवतीय असा आहे. परखड परंतु तर्कशुद्ध, चिंतनात्मक तरीही भावना उचंबळून सोडणारे असे त्यांचे वाङ्मय वैशिष्ट्यपूर्ण आहे. वाघनखे (१९६१), विठ्ठला पांडुरंगा (१९७३), अमरवेल (१९७४), रांगोळी (१९७६), इ. त्यांचे चौदा लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत. स्मरणी (१९७४) हा त्यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा संग्रहही उल्लेखनीय आहे.

भावे हे हिंदुत्वनिष्ठ होते. स्वा. सावरकर हे त्यांचे प्रेरणास्थान होते. हिंदुमहासभा या राजकीय पक्षाचे ते काही काळ सक्रिय कार्यकर्तेही होते. अखंड भारत हे त्यांचे श्रद्धास्थान होते. त्यांच्या साऱ्या लेखनामधून त्यांच्या या जीवनदृष्टीचे दर्शन घडते.



भावे सनातन भारतीय संस्कृतीचे व जीवनमूल्यांचे उपासक असले, तरी कर्मठ, प्रतिगामी नव्हते जीवनातील दिव्यत्व, पौरूष, सौंदर्य यांचे ते पूजक होते. स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असतानाच ते स्वैराचारावर टीका करीत. जीवनव्यवहारातील दांभिकतेचा व ढोंगीपणाचा त्यांनी विलक्षण तिटकारा होता. स्त्री ही स्त्री आहे, पुरूष नव्हे व म्हणून पुरूषाचे अनाठायी अनुकरण करणे स्त्रीने सोडून द्यावे, असे ते सांगत. भारतीय संस्कृतीतील केवळ सत्वांशच ते ग्राह्य मानीत आणि हिंदुसमाजाच्या ऐक्याला विघातक अशा जातिभेदादी गोष्टींवर टीका करीत.

भाव्यांच्या लेखसंग्रहांतून त्यांची ही मते त्यांनी प्रामाणिकपणे मांडली आहेत. मात्र त्यांच्या ललित लेखनातून त्यांचा आविष्कार फारसा आढळत नाही. मराठी नवकथेचे एक प्रवर्तक म्हणून भाव्यांचे नाव घेतले जाते पण त्यांची कथा रूढ अर्थाने नवकथा नाही. नवी असूनही तिने जुन्या कथेशी नाते राखले आहे. ‘सतरावे वर्ष’, ‘सीमेवर’, ‘सावल्या’, ‘काळ, काम आणि वेग’, ‘ स्वप्न’, ‘ ध्यास’, ‘मुक्ती’, ‘रूप’, ‘प्रतारणा’, ‘पुतळा’, ‘दुःख’, ‘फुलवा’, ‘पहिले पाप’, ‘संगम’, ‘घायाळ’, ‘नौका’, यांसारख्या अप्रतिम कथा लिहून भाव्यांनी मराठी कथासृष्टीत आपले नाव अजरामर केले आहे. भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या त्यांच्या नौका (दु. आवृ. १९६३) या कथासंग्रहातील कथा तर एकूण मराठी कथासृष्टीत आपल्या पृथगात्म स्वरूपाने उठून दिसतात. जीवनातील तारूण्याचे व कारूण्याचे, शाश्वतेचे व नश्वरतेचे ते सारख्याच समरसतेने चित्रण करतात. करूणरसाप्रमाणेच हास्यरसाचेही दर्शन ते तेवढ्याच प्रभावीपणे घडवितात ‘आइसक्रिम’ ही त्यांची विनोदी कथा दृष्टीने उल्लेखनीय आहे. त्यांचे एकूण सत्तावीस कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतूनही हेच जीवनदर्शन आढळते. अकुलिना (१९५०) आणि वर्षाव (१९५५) यांसारख्या कादंबऱ्यांतून ते स्त्रीव्यवथेचे विलक्षण हळुवारपणे चित्रण करतात. अडीच अक्षरे (१९६३) या कादंबरीतून प्रेमभावनेचे विविध पदर उलगडून दाखवणारे भावे आग (१९६१), रोहिणी (१९६२), पिंजरा (१९६४), मागं वळून (१९६६), सायंकाळ (१९६८), व्याध (१९६९), रखमाच्या मुली (१९७४) इ. कादंबऱ्यातून मानवी विकारविलसिताचे व नियतीच्या प्रभावाचे अप्रतिम चित्रण करतात. त्यांच्या एकूण एकोणिस कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

नाटककार म्हणूनही भाव्यांनी लौकिक प्राप्त केला होता. विषकन्या (१९४३), स्वामिनी (१९५६), महाराणी पद्मिनी (१९७१) ही त्यांची गाजलेली नाटके. सौभाग्य आणि माझा होशील का? या चित्रपटांच्या कथा त्यांनी लिहिल्या होत्या. उत्तर-दिग्विजय (१९६४-६५) आणि चितोड यात्रा (१९६८-६९) ही त्यांची प्रवासवर्णने प्रसिद्ध आहेत.

नगर येथे १९६४ साली भरलेल्या मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करून नाट्यरसिकांनी भाव्यांच्या नाट्यसेवेचे कौतुक केले होते. भावे हे साहित्यक्षेत्रातील एक निरलस कर्मयोगी होते. त्यांची साहित्यसेवा लक्षात घेऊन पुणे येथे १९७७ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. ते उत्कृष्ट वक्ते होते. मुंबई येथे त्यांचे १३ ऑगस्ट १९८० रोजी निधन झाले.

**–व.कृ. वऱ्हाडपांडे**
**(मराठी विश्वकोष)**

# पाली-खोपोली मार्गावर खुरावले फाटा 'डेथ ट्रॅप'

## स्पीडब्रेकरसाठी बहुजन विद्यार्थी संघटनेकडून तहसीलदारांना निवेदन



**पाली : प्रतिनिधी**

एमएसआरडीसी मार्फत शेकडो कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या पालीखोपोली रस्त्यावर अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. विशेषतः खुरावले फाटा येथे वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, येथे तातडीने स्पीड ब्रेकर बसविण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष अमित बाळू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सुधागड तहसीलदार यांना एमएसआरडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना (रायगड विभाग) उद्देशून निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, नवीन रस्ता झाल्यापासून वाहनांचा वेग प्रचंड वाढला असून खुरावले फाटा हा अपघातांचा मुख्य केंद्रबिंदू ठरत आहे.

यापूर्वी प्रशासनाशी वारंवार संपर्क साधूनही याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करण्यात आले आहे, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. नागरिकांचा जीव वाचवण्यासाठी आणि अपघातांना लगाम घालण्यासाठी प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन खुरावले फाटा येथे त्वरित गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसवावेत.

जर प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली नाही, तर बहुजन विद्यार्थी संघटना आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# अखेर कर्जत रेल्वेस्थानकाच्या बाहेर असलेले एटीएम मशीन सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**




कर्जत रेल्वे स्थानका बाहेर बसविण्यात आलेले ए टी एम मशीन सुरु करण्यात आले असून प्रवाशांची आता रोख पैशांसाठी होणारी धावपळ थांबणार आहे. कर्जत रेल्वे स्थानकाच्या बाहेर ए टी एम मशीन बसविण्यात आले होते. सदर मशीन काही दिवसात सुरू करण्यात येईल. अशी माहिती रेल्वे प्रशासनाने सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांना लेखी कळविले होते. सदर मशीन कर्जत रेल्वे स्थानकात बसविण्यात आली असून लाईटच्या कनेक्शनचं काम पूर्ण झाल्यानंतर सदर ए टी एम मशीन सुरू होणार असल्याचे रेल्वे प्रशासन ओसवाल यांना लेखी कळविले होते. या बाबतीत ओसवाल यांचा सदर मशीन सुरू करण्याबाबतचा सतत पाठपुरावा सुरू होता. आता सदर एटीएम मशीन सुरू करण्यात आले आहे. असे रेल्वे प्रशासनाने पंकज ओसवाल यांना कळविले आहे.

कर्जत रेल्वे स्थानकाच्या बाहेर , मुख्य गेट जवळ, ए टी एम मशीन बसविण्यात यावे. या साठी कर्जत चे सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल गेल्या कित्येक वर्षापासून प्रयत्नशील होते . यासाठी काही महिने पूर्वी रेल्वेचे अधिकारी खासदार श्रीरंग बारणे यांच्या सोबत कर्जत रेल्वे स्थानकात पाहणी करण्या साठी आले असताना सुद्धा ओसवाल यांनी सदर विषयी खासदार व रेल्वे अधिकाऱ्यांच्या समोर मांडला होता.अखेर केलेल्या प्रयत्नांना यश आले असून सदर ए टी एम मशीन कर्जत रेल्वे स्थानकांच्या बाहेर लावण्यात आले आहे ते सुरू करण्यात आले.

आजकाल बहुतेक प्रवासी खासकरून युवा पिढी, सोबत रोख पैसे ठेवणे टाळतो कारण आज खूप ठिकाणी पैसे काढण्यासाठी ए टी एम मशीन ची व्यवस्था असते. रेल्वे स्टेशन च्या बाहेर पडल्यानंतर , प्रवासी ए टी एम च्या शोधात असतो. परंतु कर्जत रेल्वे स्थानकाच्या बाहेर ए टी एम मशिन नसल्याने सर्वच प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत असे. याबाबतीत बऱ्याच प्रवाशांनी पंकज ओसवाल यांच्याकडे, कर्जत रेल्वे स्टेशनच्या बाहेर ए टी एम मशीन असणे फार महत्त्वाचे आहे

# रायगड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतपेढीच्या अध्यक्षपदी राजेंद्र गायकवाड

**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषद सहकारी पतपेढीच्या अध्यक्षपदासाठी शुक्रवारी (दि. १०) निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत राजेंद्र गायकवाड यांनी १३ पैकी ९ मतं मिळवून विजय प्राप्त केला.

प्रभारी अध्यक्ष व उपाध्यक्ष वैभव पाटील, सेक्रेटरी सुदिन कांबळे, आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अमोल खैरनार यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी पतपेढीचे संचालक सुनील घुटे, महेंद्र पुगावकर, स्नेहल मोरे, निलेश कार्लेकर, दीपक देवरुखकर, अमरदीप ठोंबरे, सुनील भुरे, राजेंद्र म्हात्रे, स्मिता पाटील कार्यालयीन अधिकारी सचिन वावेकर, प्रथमेश घरत, उमेश पाटील उपस्थित.



# कुर्मि क्षत्रिय महासभेच्या युवा प्रवक्तेपदी दीपक पाटील

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



चौक वावर्ले येथील कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दीपक गणपत पाटील यांचा देशभरातील जनसंपर्क व सामाजिक कार्यांची दखल घेऊन त्यांची अखिल भारतीय कुर्मि क्षत्रिय महासभेच्या राष्ट्रीय युवा प्रवक्तापदी दिपक पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

अखिल भारतीय कुर्मि क्षत्रिय महासभेचे महासचिव डॉ.उमेश कुमार पटेल यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे.दिपक पाटील यांच्या कानसा वारणा फाउंडेशनच्या वतीने राज्यात तसेच राज्याबाहेर विविध सांस्कृतिक, सामाजिक आदी कार्यक्रम सुरूच असतात.सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे किट वाटप, गरजूंना किराणा सामानाचे किट, नागरिकांसाठी आरोग्य शिबीर, सर्वसामान्य नागरिकांना नोकरी उपलब्ध करून देणे आदी कार्यक्रम सुरूच आहेत.राष्ट्रीय युवा प्रवक्तापदी नियुक्ती झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कर्जत-मुरबाड महामार्गावरील सुरक्षा कठडे, लोखंडी प्लेटची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत मुरबाड या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ या रस्त्यावरील सुगवे पिंगळे वाडी या भागातील रस्त्याच्या बाजूचे सुरक्षा कठडे चोरीला गेले आहेत. राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून चोरीला जाणाऱ्या लोखंडी बॅरिकेट्स बद्दल कोणतीही दखल घेतली जात नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्ता काँक्रिट चा बनविला गेलेला आहे.या रस्त्यावर कर्जत तालुका हद्दीत कळंब पासून सुगवे या भागात फार तुरळक लोकवस्ती आहे. मात्र या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वळणे आहेत. तसेच रस्त्याच्या बाजूला जंगल प्रदेश आहे. त्याचा परिणाम या भागात रात्री वाहतूक करणे देखील धोकादायक मानले जाते. अशावेळी रस्त्यावरील सुरक्षा कठडे हे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी मदतगार ठरत असतात.सुगवे पिंगळेवाडी परिसरात वाहनांच्या सुरक्षेसाठी कठडे बांधण्यात आले. मात्र तेच कठडे आणि त्यातील लोखंडी प्लेट या चोरीला गेल्या आहेत. या चोरीला गेलेल्या प्लेटमुळे या रस्त्यावरील सुगवे पिंगळेवाडी भागातील रस्ता धोकादायक बनला आहे.

# र.वा. दिघे यांच्या नावाने खोपोलीत साहित्य भवन उभारणार -नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**

रघुनाथ वामन दिघे हे मराठीतील काळाच्या पुढे जाऊन लेखन करणारे साहित्यिक होते. त्यांच्या साहित्य लेखनाने मराठी वाचकांना कायमच अंतर्मुख केले आहे. कल्पनाविलास न मांडता सामाजिक बांधिलकीतून वास्तवाची स्पष्ट जाणीव दिघे यांच्या साहित्यातून व्यक्त होते. त्यामुळे त्यांचे लेखन मराठी रसिक वाचकांना कायमच नवी दृष्टी देत राहील, अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार हेमंत कर्णिक यांनी व्यक्त केली. कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा खोपोली आयोजित र.वा. दिघे यांची १३० वी जयंती व शाखेच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक रामदास शेंडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.



आपल्या भाषणात कर्णिक यांनी दिघे यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेताना लोकसंस्कृती, लोकजीवन, निसर्ग, माणूस, त्यांच्या समजुती, बोलीभाषा यांचा सर्जनशील आविष्कार दिघे यांच्या लेखनातून कसा व्यक्त होतो, याबद्दलची अभ्यासपूर्ण मांडणी केली. ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवरील दिघे आपल्या कथा व कादंबऱ्यांतून समकालीन जीवनाबरोबरच काळाच्या पुढे जाणारा विचार व्यक्त करीत होते. दिघे यांचे साहित्य आशयाबरोबर लेखनशैलीच्या बाबतीतही समकालीन लेखनापेक्षा अनेक बाबतीत वेगळे होते, असे ते म्हणाले.

याप्रसंगी कोकण मराठी साहित्य परिषद केंद्रीय कार्यकारणी अध्यक्ष नमिता कीर, कोमसाप चे विश्वस्त प्रा.एल. बी. पाटील, जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, अल्टा लॅबचे मॅनेजर बी.एस. म्हात्रे, र.वा. यांच्या स्नुषा व साहित्यिक उज्ज्वला दिघे, वामनराव दिघे, कवयित्री रेखा कोरे, खोपोली शाखाध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. दीपप्रज्वलन व र.वा.दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. सर्व मान्यवरांचे स्वागत करून खोपोली शाखेची गेल्या ३५ वर्षातली यशस्वी वाटचाल व सुरू असलेल्या उपक्रमाची माहिती शाखेचे अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये यांनी आपल्या प्रस्ताविकातून दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी र.वा. दिघे यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करून खोपोलीत साहित्य संस्कृतीचा वारसा जतन व्हावा, या उद्देशाने र.वा. दिघे यांच्या नावाने साहित्य भवन उभारण्याचा मानस व्यक्त केला. कोमसाप खोपोली शाखा करीत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून शाखेच्या सर्व साहित्यविषयक उपक्रमासाठी नगरपरिषद सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

शाखेचे सदस्य व कवी अनिलकुमार रानडे यांच्या 'काव्य मौक्तिक' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

# तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा

**नागोठणे : प्रतिनिधी**

एस.आर. दळवी (I) फाऊंडेशनतर्फे रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत आयोजित तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नागोठणे येथील श्रीमती गु.रा. अग्रवाल विद्यामंदिरात उत्साहात पार पडला.

२६ जानेवारी रोजी नागोठणे पोलीस ठाण्याच्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा निकाल जाहीर करून शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.या कार्यक्रमास नागोठणे पोलीस उपनिरीक्षक रमेश पाटील, प्राचार्य डी. एम. पवार, वाहतूक पोलीस अधिकारी मनोहर माळी, ज्येष्ठ शिक्षक रमेश जेडगे, कलाशिक्षक दशरथ गोसावी, रवींद्र कोष्टी, नेताजी गायकवाड तसेच मुख्याध्यापिका अनघा लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अपर्णा दांडेकर, निधी शिर्के, देव गोसावी आणि रिया सिंगवा या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षेबाबत मार्गदर्शन करताना नियमांचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच पोलीस व विद्यार्थी यांच्यातील मैत्रीपूर्ण नातेसंबंधाबाबतही त्यांनी माहिती दिली.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमराव शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संध्याराणी सरगडे यांनी केले. उत्साहात संपन्न वाकणनाका (सुनिल कोकळे) दि. ११ एप्रिल : एस.आर. दळवी (I) फाऊंडेशनतर्फे रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत आयोजित तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नागोठणे येथील श्रीमती गु.रा. अग्रवाल विद्यामंदिरात उत्साहात पार पडला. २६ जानेवारी रोजी नागोठणे पोलीस ठाण्याच्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचा निकाल जाहीर करून शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

# गावच्या पोलीस पाटील यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले पाहिजे -डॉ.विशाल नेहुल

**चौक : प्रतिनिधी**

गावचा पोलीस पाटील हा पोलिसांचा खरा दूत आहे, त्याने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावणे अपेक्षित आहे,असे आवाहन उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांनी केले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी विविध कंपनी यांच्या स्वामित्व धन विभागातून गाव पोलीस पाटील यांना ड्रेस कोड तयार करून दिला आहे, त्याचा वाटप कार्यक्रम खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आला होता, त्या प्रसंगी उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल बोलत होते. या ड्रेस कोड मुळे विशिष्ट ठिकाणची शिस्त, व्यावसायिकता,समानता आणि ओळख निर्माण होतें, या ड्रेस कोड मुळे गाव पोलीस पाटील यांची जनमानसातील प्रतिमा सुधारते आणि कामाचे वातावरण स्थिर राखण्यास मदत होते.



आपल्या पोलीस ठाण्यात अथवा कार्य क्षेत्रात किंवा संस्थेत योग्य पोशाख परिधान केल्याने कामाप्रती गांभीर्य दिसून येते, तालुक्यातील सर्व पोलिस पाटील यांनी एक सारखे मर्यादेत कपडे घातल्यामुळे भेदभाव कमी होतो, पेहरावाचा परिणाम जनमानसातील प्रतिमेवर होतो, असे पोलिस निरीक्षक सचिन पवार यांनी सांगितले, योग्य ड्रेस कोड हा शिस्त, व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यावसायिक वातावरणासाठी महत्त्वाचा मानला जातो. यावेळी उत्कृष्ट सेवा बजावणारे शिरवली गावच्या पोलीस पाटील सौ. गीतांजली ढमाळ व नारंगी गावचे पोलीस पाटील पंकज देशमुख यांचा सत्कार उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांनी केला. गाव पोलिसी पाटील यांनी आपल्या कार्यात कसूर करू नये, वरिष्ठ यांच्या आदेशाचे पालन करावे असे आवाहन आभार व्यक्त करताना खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत रघुनाथ ठोंबरे पाटील यांनी करून प्रत्यक पोलीस पाटील आपले काम नेटाने करतील असे आश्वासन वरिष्ठांना दिले.

# विज्ञानाची वारी शाळेच्या दारी! सुधागडच्या पीएमश्री जि.प. शाळेत प्रयोगशील विज्ञान प्रदर्शन

**पाली : प्रतिनिधी**

पुस्तकी ज्ञानाला प्रयोगांची जोड मिळाली की शिक्षण किती रंजक होते, याचा प्रत्यय सुधागड तालुक्यातील पीएमश्री रायगड जिल्हा परिषद शाळा पाच्छापूर येथे आला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आणि विज्ञानाची भीती घालवण्यासाठी शाळेत विशेष विज्ञान प्रयोग सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे टाटा मूलभूत संशोधन संस्था (TIFR), मुंबई येथील निवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक करून तायाजी हंबीर यांचे मार्गदर्शन. त्यांनी अत्यंत साध्या आणि सोप्या घरगुती वस्तूंचा वापर करून विज्ञानातील कठीण संकल्पना विद्यार्थ्यांसमोर जिवंत केल्या. "विज्ञान हे केवळ पुस्तकात नसून आपल्या दैनंदिन जीवनात आहे," हा मोलाचा संदेश त्यांनी प्रयोगांच्या माध्यमातून दिला आहे.

केवळ तज्ज्ञांचे मार्गदर्शनच नाही, तर विद्यार्थ्यांनी स्वतःही प्रयोगांमध्ये सहभाग घेतला. एका विद्यार्थिनीने पाण्याचा वापर करून फुग्याच्या साह्याने विज्ञानातील 'दाब' आणि 'हवा' या संकल्पनांचे यशस्वी सादरीकरण केले. विद्यार्थ्यांचा हा आत्मविश्वास पाहून उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी पारखे यांनी सांगितले की अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढते आणि ते चौकस बनतात. या प्रसंगी पदवीधर शिक्षक भगवान हंबीर, उपशिक्षिका श्रीमती कविता चोभे आणि नाडसुर केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनीही शाळेच्या या उपक्रमाचे अभिनंदन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल प्रचंड कुतूहल निर्माण झाले असून, भविष्यात विज्ञान क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# नवी मुंबईत घुमले सायरन..!

## हवाई हल्ला आणि 'ब्लॅक आऊट'चे थरारक प्रात्यक्षिक

**नवी मुंबई : बातमीदार**

हवाई हल्ल्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचा आणि समाजाचा बचाव कसा करावा, याचे प्रत्यक्ष दर्शन देणारे थरारक 'हवाई हल्ला आणि ब्लॅक आऊट मॉकड्रिल' गुरुवारी ९ एप्रिल रोजी कोपरखैरणे येथे पार पडले.

नवी दिल्ली महासंचालक आणि महाराष्ट्र राज्य नागरी संरक्षण संचालनालयाच्या आदेशानुसार, नागरी संरक्षण (सिव्हिल डिफेन्स), नवी मुंबई समूह, ठाणे कार्यालयामार्फत या प्रात्यक्षिक सरावाचे आयोजन करण्यात आले होते.

कोपरखैरणे, सेक्टर-११, नवीमुंबई येथील माजी सरपंच स्व. गणपतशेठ फकीरजी नाईक मैदानावर दुपारी ४.५५ वाजता या प्रात्यक्षिक सरावाला सुरुवात झाली. नागरी संरक्षण विभागाचे उपनियंत्रक विजय जाधव यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली हे मॉकड्रिल घेण्यात आले.

यावेळी नागरी संरक्षण ठाणे जिल्ह्याचे मुख्य क्षेत्ररक्षक तथा आमदार संजय केळकर आणि स्थानिक नगरसेविका श्रीमती भारती पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर नागरी संरक्षण दलाच्या जवानांनी हवाई हल्ल्यावेळी करायची कार्यवाही, जखमींवर प्रथमोपचार, आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाच्या कवायती, ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांची सुटका (विमोचन) आणि उंच इमारतींवरून केले जाणारे 'हायराईज रेस्क्यू' याचे अत्यंत शिस्तबद्ध प्रात्यक्षिक सादर केले.

या मॉक ड्रिलमध्ये नागरी संरक्षण स्वयंसेवक व मानसेवी अधिकारी (१५४) आणि होमगार्ड जवान (५०), नवी मुंबई महानगरपालिका कर्मचारी आणि आरोग्य विभागाची रुग्णवाहिका पथक, कोपरखैरणे, वाशी, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महापालिकेचे अग्निशमन दल (वाहनांसह), पोलीस बीडीडीएस (BDS) टीम आणि स्थानिक पोलीस प्रशासन, टी.डी.आर.एफ. (TDRF) टीम, आपत्ती व्यवस्थापन विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, पी.एम.श्री स्कूलचे १ हजार ८३५ विद्यार्थी



व कर्मचारी आणि सुमारे २ हजार ५०० स्थानिक रहिवासी सहभागी झाले होते.

मुख्य प्रात्यक्षिकापूर्वी ठाकुर्ली येथील मातृबेन काशीबाई पटेल कॉलेजच्या स्वयंसेवकांनी उत्कृष्ट पथनाट्य सादर केले. नागरी संरक्षणाचे प्रशिक्षण कुठे, कसे आणि का घ्यावे, याचे महत्त्व या नाट्यातून पटवून देण्यात आले. संध्याकाळी ७ वाजता 'ब्लॅक आऊट' (दिवे बंद करणे/ प्रकाश बंदी) मोहिमेचे महत्त्व सांगण्यात आले. यावेळी परिसरातील तुलशी दर्शन सोसायटी (A आणि B विंग) व परिसरात यशस्वीरित्या ब्लॅक आऊट करून युद्धासारख्या परिस्थितीत अंधाराचा वापर करून शत्रूची दिशाभूल कशी केली जाते, याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

मुख्य क्षेत्ररक्षक तथा आमदार संजय केळकर यांनी सर्व सहभागी टीमचे कौतुक केले. ते म्हणाले की, "अशा प्रकारच्या सरावामुळे नागरिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

या मॉकड्रील यशस्वीततेसाठी आपत्ती व्यवस्थापन विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांचे अनमोल सहकार्य लाभले.

उपनियंत्रक विजय जाधव यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवकांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात चारही उपमुख्य क्षेत्ररक्षक, १५ विभागीय क्षेत्ररक्षक आणि त्यांच्या उपविभागीय क्षेत्ररक्षक पथकांनी मोलाचे योगदान दिले. 'वंदे मातरम'ने या मॉक ड्रिलची सांगता झाली.

# अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त रसायनी पाताळगंगा परिसरात उपक्रम

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा येथील रिलायन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांचे सुपुत्र उद्योगपती अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त पाताळगंगा रिलायन्स फाउंडेशनच्या वतीने रसायनी पाताळगंगा परिसरात गुरुवार, ९ एप्रिलपासून तीन दिवस विविध सामाजिक, धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

गुरुवारी पाताळगंगा रिलायन्स कंपनीतील म्हसोबा मंदिरात अभिषेक, मंत्रजप करुन व्यवस्थापनाकडून अनंत अंबानी यांना दिर्घायुष्य लाभो असे हात जोडून साकडे घातले. यानंतर दुपारी कैरे आदीवासी वाडीतील ४५ कुटूंबांना, बोरीवली वाडीतील १७ कुटुंबांना महिनाभर पुरेल इतके किराणा सामानाचे किट रसायनी पाताळगंगा व नागोठणे रिलायन्सचे क्लस्टर हेड अविनाश श्रीखंडे, साईड प्रेसिडेंट सुंदररंजन रंगराजन एचआर हेड थॉमस



ईसो, विशाल गडाख, कार्पोरेट अफेअर्सचे संतोष विचारे, सुमित बरमण आदींचा हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी माजी सरपंच अविनाश पाटील, माजी सरपंच अशोक मुंढे, नंदकुमार पाटील उपस्थित होते. वाटपावेळी अविनाश श्रीखंडे यांनी सदर वाड्यांना लगातार सहा महिने किराणा सामानाचे किट वाटप करणार असल्याचे सांगितले.

अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त लोधिवली टाऊनशिप मंदिरात दिवसभर मंत्रजप सुरू होते.सायंकाळी लोधिवली व बोरीवली मंदिरात संगीत भजन व ग्रामस्थ भजनाचा कार्यक्रम झाला.परिसरात मिठाई वाटप करण्यात आली.रात्री लोधिवली टाऊनशिपमध्ये कलात्मक कार्यक्रम होवून कामगार कुटुंबाला अन्नदान करण्यात आले.यावेळी रिलायन्स पाताळगंगा व्यवस्थापनाकडून केक कापून अनंत अंबानी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

शुक्रवार दि.१० रोजी रसायनी पाताळगंगा परिसरातील आठ जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे किट वाटप करण्यात आले.तसेच कंपनीलगतच्या एमआयडीसी परिसरात विविध जातींच्या ३१०० वृक्षांची लागवड करण्यात आली.या वृक्षांचे संवर्धन रिलायन्स इंडस्ट्रीज पाताळगंगाकडून करण्यात येणार आहे.

# मोहोपाडा आळी आंबिवलीत श्री स्वामी समर्थ मठ मिरवणूक व प्राणप्रतिष्ठा सोहळा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा आळी आंबिवली येथे आकर्षक श्री स्वामी समर्थ मठ साकारण्यात आले आहे.या मठातील श्री स्वामी समर्थ प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.गुरुवार दि.९ रोजी सकाळी गणेश पुजन,पुण्याहवन, मातृकापूजन नांदी श्राद्ध, दुपारी अग्नी स्थापना नवग्रह मंडळ,वास्तूमंडळ व मुख्य देवता मंडळ स्थापना कार्यक्रम झाला.यानंतर दुपारी पाच ते आठ वाजता मोहोपाडा पोलिस चौकी येथून मुख्य बाजारपेठ तेथून आळी आंबिवली गावातून श्री स्वामी समर्थ मठ अशी नगर प्रदक्षिणा करण्यात आली.या मिरवणूक रथात कळश तसेच श्री स्वामी समर्थांची मुर्ती बसविण्यात आली होती.झांझफथक व बॅण्डच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली.यावेळी महिलांनी डोक्यावर तुळशीवृंदावन घेतल्याचे पहावयास मिळाले.तर शुक्रवार दि.१० रोजी सकाळी त्रिपर्याय हवन,मुर्ती स्थापना,कलश प्राणप्रतिष्ठा,तत्वन्यास,कळशारोहन, दुपारी षौढशोपचार पुजा,आरती आदी कार्यक्रम पार पडले.या सोहळ्यात दोन दिवस आळी आंबिवली,मोहोपाडा, नवीन पोसरी ग्रामस्थांसह श्री स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १८ लाखांच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल :** घरातील तिजोरीतून मुलानेच दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना खारघरमध्ये उघडकीस आली. या प्रकरणी मुलाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात ९ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ३० मार्च ते ४ एप्रिलच्या दरम्यान महावीर हेरिटेज, सेक्टर ३५, खारघर या घरातून श्रवण सतीश मांढरे याने तिजोरीमध्ये ठेवलेले साडेसोळा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपीला खारघर पोलिसांनी अटक केली असून त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने १३ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

# उरणमध्ये मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहीम

**उरण : वार्ताहर**

गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होऊ नये म्हणून १४ वर्षांवरील वयोगटातील मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहीम शासनाने हाती घेतली आहे. कोणत्याही शासकीय रुग्णालयात ही लस उपलब्ध आहे.त्यामुळे पालकांनी मुलींच्या भविष्याची काळजी घेऊन कॅन्सर प्रतिबंधक लस घेण्याचे आवाहन उरण येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक बाळासो कालेल यांनी केले आहे.

हल्लीच्या काळात मुली वयात येण्याआधीपासुनच गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे.यामुळे भविष्यात पालकांनी मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासुन दूर ठेवण्यासाठी वेळीच खबरदारी घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.यावर उपाययोजना



म्हणून केंद्र, राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून १४ वर्षांवरील वयोगटातील मुलींना एचपीव्ही लस देण्याची मोहीम शासनाने हाती घेतली आहे.

युएसई देशातील कंपनीच्या एचपीव्ही लसीची बाजारात किंमत ४५०० रुपये किंमत आहे.मात्र शासनाकडून मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.या लसीकरणाचे कोणत्याही प्रकारचे साईड इफेक्ट नाहीत.त्यामुळे ही एकमेव लस वयात आलेल्या मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासुन दूर ठेवण्यासाठी व मुलींच्या भविष्य सुरक्षिततेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे.

त्यामुळे पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता १४ वर्षांवरील मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासुन दूर ठेवण्यासाठी शासकीय रुग्णालयात लसीकरण करून घ्यावे.यासाठी मुलीच्या वयाचा दाखला, आधार कार्ड,अपार कार्ड आदी कागदपत्रे सोबत घेऊन येण्याचे आवाहन उरण येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक बाळासो कालेल यांनी उरणकरांना केले आहे.काही शंका असल्यास १४१ क्रमांकावर संपर्क साधुन शंकांचे निरसन करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# लेखक श्रीकांत बोजेवार यांनी उलगडविले बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वातील दिलखुलास पैलू

**नवी मुंबई : बातमीदार**

कोणतीही व्यक्ती आपल्या जीवनात विविध अनुभवांतून, भावभावनांतून जात असते. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनाला अनेक पैलू असतात. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वातही अनेक पैलू होते. सर्वसाधारणपणे बाबासाहेबांच्या अभ्यासू, ज्ञानी, विद्वान, गंभीर व्यक्तिमत्वाची ओळख आपल्याला असते. मात्र एक व्यक्ती म्हणून बाबासाहेबांच्या जीवनातील विविध पैलूंची ओळख वेगवेगळया घटना, प्रसंग, अनुभव यातून सांगत ज्येष्ठ संपादक, लेखक श्रीकांत बोजेवार यांनी बाबासाहेबांच्या दिलखुलास व्यक्तिमत्वाची ओळख करुन दिली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'जागर २०२६' मध्ये 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर



: गंभीर आणि दिलखुलास' या विषयावर चौथे व्याख्यानपुष्प गुंफताना संपादक, लेखक श्रीकांत बोजेवार बोलत होते. याप्रसंगी समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती सभापती रंजना सोनवणे, नगरसेवक सुधाकर सोनवणे, परिवहन सदस्य यशपाल ओव्हाळ, उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, कार्यकारी अभियंता प्रविण गाडे, माजी नगरसेविका डॉ.गौतमी सोनवणे, माजी शिक्षण सदस्य अंकुश सोनावणे, लेट्स रीड फाऊंडेशनचे प्रमुख प्रफुल्ल वानखेडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

प्रचंड वाचन, चिंतन, मनन यामधून घडलेले बाबासाहेबांचे ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्व गंभीर भासले तरी एक व्यक्ती म्हणून ते अत्यंत संवेदनशील, रसिक आणि दिलदार होते हे सांगताना आपण बाबासाहेबांवर लिहिलेल्या अनेक पुस्तकांतून, त्यांचा अभ्यास करणा-या व्यक्तींशी प्रत्यक्ष बोलून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे जाणून घेतले अशी सुरुवात करत श्रीकांत बोजेवार यांनी आपल्या कुत्र्यावर जीवापाड प्रेम करणारे दयाळू बाबासाहेब, व्हॉयलीन व सारंगी वादनातून मनःशांती जपणारे बाबासाहेब, नाटयसंगीत चित्रपटप्रेमी रसिक बाबासाहेब, पाकशास्त्र पारंगत बाबासाहेब, पुस्तकासाठी स्वतंत्र घर बांधणारे प्रचंड पुस्तकप्रेमी बाबासाहेब, निखळ विनोदबुध्दी जपणारे बाबासाहेब असे विविध पैलू उलगडताना अनेक दुर्मिळ आठवणी सांगितल्या.

आजच्या व्याख्यानातून कधीही समोर न आलेला बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वातला दिलखुलास पैलू समोर आला आणि बाबासाहेबांच्या आम्ही अधिकच प्रेमात पडलो व त्यांच्याबद्दलचा आदर आणखी वाढला अशा प्रतिक्रिया व्याख्यानानंतर रसिक श्रोत्यांनी व्यक्त केल्या.

# ४ मे रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या अनुषंगाने आज दि. ०६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनात एकूण ०४ प्राप्त अर्जांची महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सुनावणी घेऊन संबंधित विभागांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

माहे मे महिन्याचा लोकशाही दिन दि. ०४ मे २०२६ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. १७ एप्रिल २०२६ पर्यंत 'मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावर जलद दुवे आयकॉनवर उपलब्ध असून तेथून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.१५ ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.

अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक-आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

# ग्रामीण भागात लोहारांची लगबग

## शेती अवजारांच्या दुरूस्तीसाठी पारंपरिकतेवर भिस्त



**उरण : बातमीदार**

उरण शहरात व तालुक्यातील ग्रामीण भागात आजही पारंपरिक व्यवसाय जिवंत ठेवणारे लोहार त्यांच्या कलेतून उपजीविका करताना दिसत आहेत. उरण मध्ये शेती हंगामाच्या पार्श्वभूमीवर लोहारांची चांगलीच लगबग सुरू आहे. उरण मध्ये ग्रामीण भागातील अनेक शेतकरी विविध शेती अवजारांची दुरुस्ती आणि निर्मिती करण्यासाठी लोहारांकडे जात आहेत.उरण मध्ये शहरात व ग्रामीण भागातही लोहारची तात्पुरती टेन्ट टाकून दुकाने सुरु आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांनाही आपली कामे करणे सोप्पे जात आहे.

गावोगावी तात्पुरत्या निवाऱ्यात कुटुंबासह वास्तव्यास असलेले लोहार भट्टी पेटवून लोखंड तापवतात आणि हातोड्याच्या सहाय्याने त्याला आवश्यक त्या आकारात घडवतात. नांगर, कोयता, विळा यासारख्या अवजारांना धार लावणे, दुरुस्ती करणे तसेच नवीन साधने तयार करणे यासाठी शेतकरी लोहारांकडे जात आहेत. या कामात महिलाही सक्रिय सहभाग असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कुटुंबातील सर्व सदस्य मिळून हा व्यवसाय सांभाळत असल्याने उत्पादनात सातत्य राहते. आधुनिक यंत्रसामग्रीच्या वाढत्या वापरातही ग्रामीण भागात या पारंपरिक कलेचे महत्त्व अजूनही टिकून आहे.सध्या उन्हाळा आहे. आता जून महिन्यात पावसाळा सुरु होणार असल्याने उन्हाळ्या मधील सर्व शेतीची कामे व अवजारांची कामे उरकून घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

> *सध्या बहुतांश शेतकरी आधुनिक साधनसामग्रीकडे वळले आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणे आमचा धंदा चालत नाही. कामाचे प्रमाण कमी झाले असले तरी आमच्याकडे असलेली पारंपरिक कला जपण्याचा आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.*
>
> – **बाबू पाटील**, लोहार

# मोहपाडा येथे हिंदू संमेलनाचे आयोजन

**रसायनी : प्रतिनिधी**

मोहपाडा येथे हिंदू संमेलनाचे आयोजन रसायनी मोहपाडा येथील सकल हिंदू समाज यांच्या वतीने धर्माचा अभिमान व समाजातील एकोप्यासाठी मोहपाडा येथील जनता विद्यालयात च्या मैदानावर रविवार दिनांक १२ रोजी संध्याकाळी पाच वाजता भव्य असा हिंदू संमेलनाचा संमेलन आयोजित करण्यात आले आहे

या हिंदू संमेलनाला सहकार्यवाहक राष्ट्रीय स्वयंसक संघाचे श्रीकृष्ण गोपालजी यांचे प्रमुख मार्गदर्शन असून ह भ प वामन महाराज भोईर व ह भ प सच्चिदानंद महाराज कांबेकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे तरी परिसरातील सर्व हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने या हिंदू संमेलनाला उपस्थित राहावे असे आवाहन या भागातील सकल हिंदू समाजाच्या आयोजकांनी केले आहे.

# अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त राजिप शाळा वडगाव येथे साहित्य वाटप

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव येथे अनंतभाई अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर ,पाणी बॉटल,दोन जोडी कपडे देऊन साजरा करत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या वन्यजीव प्रेम दर्शविणाऱ्या वनतारा या प्राणी संग्रहालायची चित्रफीत दाखवून त्यांच्या कार्याची ओळख देण्यात आली.तसेच त्यांच्या वाढदिवसाचा केक कापून विद्यार्थ्यांना वाटण्यात आला.तसेच सर्व आलेल्या अधिकाऱ्यांनी शालेय परिसर व शैक्षणिक उपक्रम वातावरणाचे तोंडभरून कौतुक केले.याप्रसंगी १ली ते ५ वी च्या ७९ विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.परीसरात आठ जिल्हा परिषद शाळांत शुक्रवारी शालोपयोगी साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी गौरीताई महादेव गडगे, पंचायत समिती सदस्या,माजी उपसरपंच महादेव कमलाकर गडगे रिलायन्स उद्योग समूहाचे एचआर हेड थॉमस साहेब,.संतोष विचारे साहेब,एचआर व्यवस्थापक रामदास बंड , सागर ऐकेने ,राजश्री नरेश जांभुळकर



> *अनंत अंबानी यांचा वाढदिवस वडगाव सारख्या दुर्गम भागातील परंतु विद्यार्थी हित जोपासणाऱ्या शाळेत पार पडले,याचे मुलांसाठी नक्कीच सकारात्मक परिणाम दिसत आहेत. मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद खूप काही सांगून गेला. शाळेचे व रिलायन्स समूहाचे आभार*
>
> –**गौरी गडगे**, सदस्य, पंचायत समिती, खालापूर

अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, वडगाव,करुणा रवींद्र ठोंबरे माजी अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती वडगाव,सुभाष राठोड मुख्याध्यापक उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून अनंतजी अंबानी यांचे कार्यालयीन विशेषाधिकारी बर्मन साहेब उपस्थित होते.त्यांनी भविष्यातील शालेय विकासासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

शाळा फारच सुंदर असून शालेय वातावरण स्वच्छ व आनंददायी आहे.विशेष बाब म्हणजे मुख्याध्यापक फारच सहकार्य भावना ठेवून नम्रतेने सर्वांशी वागत होते.त्यांनी त्यांना झालेल्या कोणत्याही दुखापतीचा इथे कारण दिले नाही.संपूर्ण कार्यक्रम स्वतः लक्ष देऊन पार पाडला आम्ही शाळेचे आभारी आहोत, असे थॉमस ईसो म्हणाले.

# रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने रोहा शहरातील रोहा कोलाड मार्गावरील फिरोज टॉकीज ते नवरत्न हॉटेलपर्यंत अतिक्रमण हटाव मोहीम घेण्यात आले आहे अनाधिकृत टपऱ्या, हातगाडी, अनधिकृत सेड पाडण्याचे काम जोरदार सुरू आहे. रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने अतिक्रमणाच्या विरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे.

फिरोज टॉकीज ते दमखाडी या दरम्यान सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास होतो असल्याचे सातत्याने दिसून येत आहे.

या अनुषंगाने नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी रोहा शहरातील वाढत्या वाहतूक कोंडी च्या पार्श्वभूमीवर रस्ते रुंदीकरण व रस्त्यालगत असणारे अतिक्रमण हटवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. यानुसार रोहा शहरातील रस्त्यावर होत असलेल्या अतिक्रमणांमधील रोहा अर्बन बँक ते पोस्ट ऑफिस जवळील अतिक्रमण हटविण्यात आले. यावेळी स्वतः नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमदजी दर्जी,मुख्याधिकारी अजयकुमार एडके,बांधकाम सभापती राजेंद्र जैन,सभापती नीता हजारे, गटनेते महेंद्रजी गुजर, सामाजिक कार्यकर्ते प्रेषित बारटक्के, स्वप्नील धनावडे व संबंधित अधिकाऱ्यांनी सदर जागेची प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली.त्याचसोबत तीनबत्ती नाक्याजवळील अतिक्रमण हटवण्यासाठी ही पाहणी करण्यात आली व अतिक्रमण हटवण्यासाठी तेथील नागरिकांना कळविण्यात आले. त्याचसोबत अतिक्रमण हटविताना स्थानिक नागरिकांना येणाऱ्या समस्या ही आपण सोडवू असे विश्वास ही नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिले

> **आपण ही कार्यवाही आपल्या रोहा शहरातील होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व त्यातून भविष्यात होणारे अपघात टाळण्यासाठी करीत आहोत. कार्यवाहीसाठी नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे आनंद आहे व भविष्यातही रोहा शहरातील नागरिकांसाठी योग्य ते पाऊल उचलू हा विश्वास ही सर्व नागरिकांना मी देते.**
>
> **–वनश्री शेडगे, नगराध्यक्ष, रोहा अष्टमी नगर परिषद**

# उमटे धरणातील पाणी पुरवठा व गाळ समस्या

**रेवदंडा : प्रतिनिधी**



जिल्हा नियोजन भवन येथे नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन सभेत पाणी समस्येचा पाढा वाचताना, उमटे धरणातील पाणी पुरवठा व गाळ समस्येवर नवनिर्वाचीत चौल जि.प.गटाचे जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ यांनी लक्ष्यवेधी मुद्दा उपस्थित केला.

या सभेत प्रारंभीच पाण्याचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत बाकी सर्व शुन्य असल्याचे चौल जि.प.सदस्य डॉ. सचिन राउळ यांनी सांगून चौल जिल्हा परिषद गटातील रेवदंडा, चौल, नागाव, वरंडे तसेच आक्षी ग्रामपंचायतीस उमटे धरणातून पाणी पुरवठा होतो, हे उमटे धरण सन १९७८ साली बांधण्यात आले असून १९९५ साली जिल्हा परिषदेकडे हस्तातंरीत करण्यात आले आहे, परंतु तेव्हापासून उमटे धरणातील गाळ काढला गेला नसल्याचे त्यांनी लक्ष्यवेधी मुद्दा मांडला. शिवाय या उमटे धरणावर एकूण ३३ वाडया व ४७ गावे पिण्याच्या पाण्यासाठी विसंबून असल्याचे म्हटले. या उमटे धरणाच्या पाण्यावर हजारों लोकांचे जीवनमान अवंलबून आहे, परंतु परिसरात जानेवारी महिन्यापासून एक दिवस आड व मे महिन्यात तीन आड पाणी पुरवठा होतो. पाणी प्रश्न सोडविण्यासाठी विशेष लक्ष्य देण्याचे आवाहन केले.

# कर्जत स्थानकातील समस्या मार्गी लावण्यासाठी सह्यांची मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी**



कोरोना काळात कर्जत रेल्वेस्थानकातील रेल्वे गाड्यांचे बंद केलेले थांबे पुन्हा सुरू करावेत यासाठी कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनकडून सह्यांची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्यांचा थांबा कर्जत स्थानकात रद्द केला आहे. दुसरीकडे स्थानकाच्या सुविधांमध्येही अनेक त्रुटी असल्याची बाब यावेळी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणण्यात आली आहे. त्यामुळे कर्जत पॅसेंजर असोसिएशनने सह्यांची मोहीम हाती घेतली आहे.

कर्जतकर रेल्वे प्रवाशांच्या प्रमुख मागण्यांमध्ये पुणे – मुंबई मार्गावरील कोयना, चेन्नई, सिद्धेश्वर व राजकोट एक्सप्रेस गाड्यांना कर्जत स्थानकात अधिकृत थांबा देणे. कर्जत – पुणे – बारामती शटलसेवा सुरू करणे, सह्याद्री व कन्याकुमारी एक्सप्रेस सीएसएमटी वरून सुरू करणे. तसेच सर्व लोकल सेवा कर्जत मुख्य स्थानकातूनच सुरू व समाप्त करणे. यांचा समावेश आहे.

याशिवाय जोधपूर, हैदराबाद, पंढरपूर व हुबळी एक्सप्रेस गाड्यांना थांबा देणे. तांत्रिक थांबा असलेल्या गाड्यांसाठी तिकिट सुविधा उपलब्ध करून देणे, कर्जत स्थानकाला जंक्शनचा दर्जा देणे. लोकल गाड्या वेळेवर चालवणे आणि 'अमृत भारत' योजनेत कर्जत स्थानकाचा समावेश करणे या मागण्याही यावेळी करण्यात आल्या आहेत.

# मध्य रेल्वेने आतापर्यंतची सर्वोत्तम मालवाहतूक आकडेवारी गाठली

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५–२६ दरम्यान ७९.३४ दशलक्ष टन (MT) इतकी उल्लेखनीय मालवाहतूक नोंदवली असून यामधून ८२७९ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे.

मध्य रेल्वेच्या पाचही विभागांपैकी नागपूर विभागाने सर्वाधिक ५४% योगदान देत ४२.७२ दशलक्ष टन लोडिंग आणि ४५९७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले असून हे एकूण उत्पन्नाच्या ५५% आहे.

मालवाहतूक पाहता कोळसा लोडिंग ३३.९२ दशलक्ष टन इतके असून एकूण लोडिंगमध्ये ४५% वाटा आहे. यामधून ३२१९ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून ते एकूण उत्पन्नाच्या ३९% आहे.

मध्य रेल्वेने लोखंडखनिज, फ्लाय ॲश आणि पेट्रोलियम उत्पादनांमध्ये आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे. यामध्ये लोखंडखनिज १०२२ रेक (मागील वर्षी ३६९ रेक) १७७% वाढ, फ्लाय ॲश ४३ रेक (मागील वर्षी २४ रेक) ७९% वाढ, पेट्रोलियम उत्पादने २६७२ रेक (मागील वर्षी २३५७ रेक) १३.४% वाढ झाली आहे

इतर वस्तूंमध्ये कंटेनरः ९५२२ रेक (मागील वर्षी ८९६० रेक) ६.३% वाढ, सिमेंट (क्लिंकरसह) २४२४ रेक (मागील वर्षी २३५० रेक) ३.१ % वाढ, (क्लिंकरमध्ये मोठी झेप ६३५ रेकच्या तुलनेत ३५५ रेक ७९% वाढ),अन्नधान्यः ४२० रेक (मागील वर्षी ३५७ रेक) १७.६% वाढ, कांदा २१२ रेक (मागील वर्षी ९१ रेक) १३३% वाढ झाली आहे

मध्य रेल्वेने विविध वाणिज्यिक उपक्रमांद्वारे मालवाहतूक वाढ कायम ठेवली असून खालील नवीन सायडिंग्स व GCT कार्यान्वित करण्यात आले आहेत यामध्ये मोसा येथे न्यू फ्युएलको GCT मार्च २०२६ पर्यंत ३५ रेक, मकरधोकरा येथे दिनेश OCM GCT ५०४ रेक, मुंगोली–निरगुडा OCM येथे MNOG GCT ५४ रेक, लोणावळा येथे एमिरेट्स टर्मिनल्स प्रा. लि. GCT (फेब्रुवारी २०२६), बल्लारशाह येथे नवीन माल टर्मिनल (३१ जानेवारी २०२६) स्टील व लोखंडखनिज वाहतूक फेब्रुवारी २०२६ पर्यंत ६० रेक वाहतूक झाले आहे.

मध्य रेल्वेने दीर्घ पल्ल्याच्या मालगाड्यांमध्ये १००% पेक्षा अधिक वाढ करत आर्थिक वर्ष २०२४–२५ मधील ३१२ गाड्यांवरून आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये ७१९ गाड्यांपर्यंत वाढ केली आहे. दररोज सरासरी ३५९ मालगाड्यांची देवाणघेवाण झाली आहे.

मालवाहतुकीचे सामाजिक व आर्थिक महत्त्व निर्माण होत असून मध्य रेल्वेच्या कार्यक्षम सेवेमुळे कांद्याचे वेळेवर वाहतूक होऊन साठवण नुकसान कमी होते व बाजारभाव स्थिर राहतात. अन्नधान्याची मोठ्या प्रमाणावर वितरण सुलभ होते.

## गोरेगाव येथे श्रीकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील गोरेगाव कुंभारआळी येथील श्रीकृष्ण मंदिराचा जिर्णोध्दार सोहळा व कलश पूजन कार्यक्रम सोमवार दि. १३,मंगळवार दि.१४ एप्रिल व बुधवार दि.१५ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मंदिराचा उद्घाटन सोहळा मंगळवार दि.१४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वा.खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते होणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी 'सुधा सितारा उपक्रम स्तुत्य'

**रोहा : प्रतिनिधी**

"आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व हुशार मुलामुलींच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीजचा 'सुधा सितारा' हा उपक्रम स्तुत्य आहे. सुदर्शन कंपनीसह येथील कर्मचाऱ्यांनी जपलेले सामाजिक भान कौतुकास्पद आहे. यातून रायगड जिल्ह्यातील हुशार व गरजू विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार होण्यास नवसंजीवनी मिळेल," असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी केले.

सुदर्शन केमिकलच्या वतीने सुधा सीएसआर अंतर्गत मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील ५०० विद्यार्थी–विद्यार्थिनींना 'सुधा सितारा' शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. रोहा येथील चिंतामणराव देशमुख सभागृहात आयोजित शिष्यवृत्ती प्रदान सोहळयावेळी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, रोह्याच्या नगराध्यक्ष वनश्री शेडगे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक सुयश सिंह, सुदर्शन केमिकल्सच्या ग्लोबल पीपल्स प्रॅक्टिस हेड शिवालिका राजे, सुदर्शन रोहा साईट हेड विवेक गर्ग, सीएसआर हेड माधुरी सणस उपस्थित होते.

अदिती तटकरे म्हणाल्या, "सुदर्शन कंपनी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गेल्या सहा वर्षात जवळपास एक हजार विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ दिला आहे. गुणवत्तेवर आधारित हा उपक्रम आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्याला जातोय, याचा आनंद आहे. यामुळे मुलींचा आत्मविश्वास वाढेल."

आंचल दलाल म्हणाल्या, "प्रशासकीय क्षेत्रात करिअर निवडताना त्याचा बारकाईने अभ्यास करावा. सोशल मीडियापासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. उच्च शिक्षण घेण्यासाठी तुम्हाला मिळालेली ही एक ऊर्जा आहे. सतत शिकत राहा, स्वतःला अपग्रेड करत राहा."

वनश्री शेडगे म्हणाल्या, "आई–वडिलांच्या भक्कम पाठिंब्याने नगराध्यक्ष पदापर्यंत पोहोचू शकले. समाजाशी आपण स्वतःला कायम जोडून ठेवले पाहिजे. आपल्या हातून समाजाची, देशाची सेवा व्हावी, लोकांचे कल्याण व्हावे, या ध्यासाने कार्यरत राहावे. सुदर्शन केमिकलसारख्या कंपन्या आपल्या पाठीशी आहेत."

व्हिडीओ संदेशाद्वारे मार्गदर्शन करताना राजेश राठी म्हणाले, "सुदर्शन एक परिवार म्हणून गेली सात दशके काम करत आहे.

महिला व बालकांना ग्रामस्नेही बनविणाऱ्या 'आदिशक्ती', जीवनकौशल्यांचे ज्ञान देणाऱ्या 'सु–उमेद' या माहितीपुस्तिकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संजय कचरे यांनी सूत्रसंचालन केले. रवी दिघे यांनी आभार मानले.

# वरसोली येथे पाठांतर स्पर्धा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी(अमृत) अलिबाग आणि उद्यम सखी संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रामजी देवस्थान,रामनाथ,वरसोली अलिबाग येथे ६ ते १० आणी ११ ते १८ या वयोगटातील अमृत वर्गामध्ये येणाऱ्या मुलांसाठी एक पाठांतर स्पर्धा झाली.

मुलांमधे भारतीय संस्कृतीच्या, हिंदू धर्माच्या, भारतीय राष्ट्रीयत्वाच्या संस्कारांची रुजवात होणं व त्यांचं संवर्धन होणं, त्याच बरोबर ईशभक्ति निर्माण होणं यासाठी अमृत संस्था गेल्या काही महिन्यांपासून मुलामुलींच्या संघटनासाठी प्रयत्नशील असून नियमितपणे त्यांच्यात परस्पर सामंजस्य, सलोखा, सहकार्य निर्माण होण्यासाठी काही बैठे/मैदानी खेळ, स्तोत्रपठण इ.कार्यक्रम राबवीत असते.

या स्पर्धेत अमृतचे शैलेश वि.मराठे यांनी पुढाकार घेतला होता. तसंच उद्यम सखी संस्था अलिबाग यांच्या.प्रार्थना दामले नागवेकर अलिबाग यानी त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य केले. रामजी देवस्थानच्या विश्वस्तांनीसुद्धा मोठ्या आपलेपणानं या कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिली.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अनघा मराठे, जान्हवी पाटील, प्रणिता म्हात्रे यांनी काम पाहिले.

# कला–क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण

**कर्जत : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा परिषद उपकर निधी अंतर्गत कर्जत पंचायत समितीच्या वतीने गुणवत्ता संवर्धन कार्यक्रम अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांसाठी कला–क्रीडा महोत्सव आयोजित केला होता. या महोत्सवात प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ झाला.

कर्जत पंचायत समितीच्या सभागृहात पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सभापती नमिता घारे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडला. त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती नारायण डामसे, उपसभापती चित्रा ठाकरे, जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे, सुवर्णा ठाकरे, सुनीता मोरे, वर्षा दोरे, उषा ठोंबरे, पंचायत समिती सदस्य नितीन धुळे, अक्षय तिटकरे, नमिता श्रीखंडे, कविता पादीर, रेश्मा जोशी, गट विकास अधिकारी सुशांत पाटील, गट शिक्षणाधिकारी अनंत खैरे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला जिल्हा परिषद शाळा किरवली येथील विद्यार्थिनींनी ईशस्तवन, स्वागतगीत सादर केले. गट विकास अधिकारी पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. गट शिक्षणाधिकारी खैरे यांनी प्रस्ताविकात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. तीन हजार दोनशे विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. १०४ पारितोषिके या विद्यार्थ्यांनी मिळविली आहेत. निवडणूक व अन्य तांत्रिक अडचणींमुळे हा समारंभ उशिरा होत आहे, असे स्पष्ट केले. पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# विळे येथे महाराजस्व समाधान शिबिराला उत्तम प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**



रा. जि. प. मराठी शाळा विळे येथे शुक्रवारी (दि.१०) राजे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांना थेट सेवा व मार्गदर्शन देण्यात आले.

या कार्यक्रमाला माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, तहसीलदार माणगाव विपीन लोकरे, महसूल नायब तहसीलदार घेमुड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पुरी मॅडम, उपभूमी अभिलेख अधिकारी सोनार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कर्मचारीवर्ग, सर्व अंगणवाडी सेविका, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉक्टर व कर्मचारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र शिरवली येथील डॉ. पटेल सर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी बाल आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मातांना व विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

उपस्थित नागरिकांना स्वतःच्या व बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. विशेषतः समतोल आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी विश्रांती यांचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच शिबिरात आलेल्या लाभार्थ्यांना आवश्यक त्या आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या.

कार्यक्रमादरम्यान तलाठी अधिकारी मारुती चाटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हेमंत बारटक्के यांनी केले, तर आरोग्य सेवक सुधीर गणपत खैरे आदींनी सहकार्य केले. या शिबिरामुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

## फुले–शाहू–आंबेडकर सप्ताह

**माणगाव : प्रतिनिधी**

लोणेर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त फुले–शाहू–आंबेडकर सप्ताह ११ ते १६ एप्रिल या कालावधीत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहात शैक्षणिक, प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची समृद्ध मेजवानी विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळणार आहे.

सप्ताहात १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यापीठात बाबासाहेब सन्मान रॅली काढण्यात येणार असून विद्यापीठाचे कुलगुरू राजनीश कामत यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर आधारित विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. हे प्रदर्शन १८ एप्रिलपर्यंत सर्व विद्यार्थ्यांसाठी खुले राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच सामाजिक समतेचा व ज्ञानाचा संदेश देणारा हा सप्ताह विद्यापीठाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरेला अधिक समृद्ध करणारा ठरणार आहे.

# आरसीएफ कंपनीकडून जिल्हा रुग्णालयाला अत्याधुनिक उपकरणे

**अलिबाग : प्रतिनिधी**



राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) तर्फे निगमत सामाजिक दायित्व (सीएसार) उपक्रमांतर्गत जिल्हा शासकीय रुग्णालय अलिबाग येथील आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी गेल्या काही वर्षांत महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले आहे. अलिबाग व परिसरातील नागरिकांना अधिक दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने आरसीएफने अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, औषधांचा पुरवठा तसेच विविध विशेष विभागांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले आहे.

सन २०२०–२१मध्ये जिल्हा रुग्णालयामध्ये अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीसाठी ७४ लाख ६९ हजार ४०० रुपये इतका निधी रुग्ण कल्याण समितीकडे हस्तांतरित करण्यात आला. त्यानंतर सन २०२२–२३मध्ये आरसीएफने १ कोटी ३७ लाख ९ हजार रुपये किमतीची प्रगत वैद्यकीय उपकरणे खरेदी करून जिल्हा रुग्णालयाला उपलब्ध करून दिली. या उपकरणांमुळे रुग्णालयाची निदान व उपचार क्षमता अधिक सक्षम झाली असून, शस्त्रक्रिया व आपत्कालीन सेवांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे. याच कालावधीत १८ लाख ३५ हजार रुपये किमतीचा आवश्यक औषधांचा पुरवठा करण्यात आला.

याशिवाय, कोविड काळात ऑक्सिजनची गरज लक्षात घेऊन आरसीएफच्या सीएसआर निधीतून रायगड जिल्ह्यात पीएसए ऑक्सिजन प्लांट उभारण्यासाठी ५४ लाख ८९ हजार इतका निधी सन २०२०–२१ रोजी जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधीमार्फत उपलब्ध करून देण्यात आला. या उपक्रमामुळे रुग्णालयातील ऑक्सिजन पुरवठा अधिक सक्षम होऊन कोविडसह इतर गंभीर रुग्णांच्या उपचारासाठी मोठा आधार मिळाला.

सन २०२४–२५मध्ये आरसीएफने जिल्हा रुग्णालयामध्ये हाय–टेक नर्सिंग सेंटर उभारण्यासाठी २५ लाख ७३ हजार रुपये इतके आर्थिक सहाय्य दिले. तसेच, डायलिसिस विभागासाठी आवश्यक औषधे व सोल्यूशन्स खरेदीसाठी २० लाख रुपये इतकी अतिरिक्त मदत देण्यात आली, ज्यामुळे किडनीविषयक आजारांनी ग्रस्त रुग्णांना सातत्यपूर्ण आणि जीवनावश्यक उपचार मिळणे शक्य झाले आहे.

या सर्व उपक्रमांमुळे जिल्हा रुग्णालयामध्ये आरोग्य सेवांची गुणवत्ता आणि क्षमता लक्षणीयरीत्या वाढविण्याचे आरसीएफचे नेहमीच प्रयत्न राहिले आहेत. आरसीएफ आपल्या निगमत सामाजिक दायित्व उपक्रमांद्वारे आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकास क्षेत्रात सातत्याने योगदान देत असते.

# राजस्थानच्या विजयाचा ‘चौकार’

## आरसीबीवर मात; वैभव, ध्रुवची फटकेबाजी



**गुवाहटी : वृत्तसंस्था**

गुवाहटीच्या मैदानात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने प्रमुख गोलंदाजांची केलेली धुलाई आणि ध्रुव जुरेल याच्या दमदार खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सच्या संघाने यंदाच्या हंगामातील सलग चौथा विजय नोंदवला. दुसरीकडे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघावर पहिल्या पराभवाची नामुष्की ओढावली.

पहिल्यांदा फलंदाजी करताना अवघ्या ९४ धावांवर सहा विकेट्स गमावल्यावर रजत पाटीदार आणि व्यंकटेश अय्यरच्या दमदार खेळीच्या जोरावर बंगळुरूच्या संघाने निर्धारित २० षटकांत आठ विकेट्सच्या मोबदल्यात २०१ धावा करत राजस्थानच्या संघासमोर २०२ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशीने पॉवर प्लेमध्ये तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश केला. यंदाच्या हंगामातील दुसरे अर्धशतक झळकावत त्याने आरसीबीच्या गोलंदाजांचे खांदे पाडले. त्याने आपली जबाबदारी अगदी चोख बजावल्यावर ध्रुव जुरेल याने शानदार अर्धशतक झळकावत रवींद्र जडेजाच्या साथीने संघाचा विजय निश्चित केला.

तत्पूर्वी राजस्थानचा कर्णधार रियान पराग याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तगडी फलंदाजी असलेल्या बंगळुरूची अवस्था ६ बाद ९४ अशी बिकट झाली. संघ अडचणीत असताना आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार याने ४० चेंडूत ६३ धावांची दमदार खेळी साकारली. अखेरच्या षटकात रोमारियो शेफर्ड याने ११ चेंडूत २२ धावा आणि व्यंकटेश अय्यरने १५ चेंडूत केलेल्या २९ धावांच्या खेळीच्या जोरावर बंगळुरू संघाने निर्धारित २० षटकात २०१ धावा केल्या होत्या.

राजस्थान संघाची सुरुवात खराब झाली. यशस्वी जैस्वाल संघाच्या धावफलकावर २१ धावा असताना माघारी फिरला. त्याने आठ चेंडूत १३ धावा केल्या. त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल जोडी जमली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी फक्त ३७ चेंडूत १०८ धावांची भागीदारी रचली. वैभवने २६ चेंडूत ७८ धावांची धमाकेदार खेळी साकारली. त्यानंतर शिमरॉन हेटमायर, कर्णधार रियान पराग लवकर परतले, पण ध्रुव जुरेलने ४३ चेंडूत आठ चौकार व तीन षटकारांच्या मदतीने ८१ धावांची नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या बाजूला रवींद्र जडेजा २५ चेंडूत २४ धावांवर नाबाद राहिला.

# टीआयपीएल अंडर-१९ क्रिकेट स्पर्धेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोसायटी क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित टीआयपीएल सिझन ३ अंडर-१९ क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.११) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर खेळली जात आहे.



उद्घाटन समारंभाला महापौर नितीन पाटील, भाजप पनवेल शहर अध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, गणेश कडू, शशिकांत शेळके, महादेव मधे, नगरसेविका प्रीती जॉर्ज, उद्योजक राजू गुप्ते , भाजप नेते बबन बारगजे, महेश मोहिते, स्वप्नील ठाकूर, प्रवीण मोहोकर आदी उपस्थित होते.

स्पर्धेत १६ संघांमध्ये सामने रंगणार असून विजेत्या संघांसाठी भरघोस बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पर्धेत सहभागी सर्व संघांना आणि खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



# नागोठण्यात ग्रामीण प्रीमियर लीगचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील वजरोली येथील कै. मधुशेठ काळे क्रीडांगणावर ग्रामीण प्रीमियर लीग २०२६ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि. ११) राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते प्रथमेश काळे यांच्या हस्ते झाले.

या वेळी शेखर ठाकूर, एकनाथ ठाकूर, तुकाराम कदम, प्रकाश कदम, प्रल्हाद राणे, दिनेश इंद्रे, अश्विन तेलंगे, महादेव दळवी, विराज दळवी, अनिरुद्ध जाधव, प्रसाद जांबेकर, अखिल ताडकर, अमोल ताडकर, किशोर म्हात्रे, विलास भिसे, मोतीराम तेलंगे, मनोज वाजे, रत्नमाला लोखंडे, मधुकर गायकर, रवींद्र लोखंडे, नरेश दळवी, संदेश कासार, अनिल कासार आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे आयोजक समितीचे अध्यक्ष विश्वास गायकर, इतर पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने हजर होते.

स्पर्धेचा उद्घाटनीय सामना विधी इंटरप्रायजेस विरुद्ध हर्ष हॉटेल वाघळी यांच्यात रंगला. या सामन्यात वाघळी संघाने विजय मिळवला. सामन्यापूर्वी राष्ट्रगीत झाले तसेच युवा क्रिकेटपटू योगेश दिघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

ग्रामीण प्रीमियर लीगचे हे आठवे पर्व असून यावर्षी तब्बल १६ संघांनी सहभाग नोंदवला आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष विकास ठाकूर, सचिव राकेश शेलार, खजिनदार दिनेश भिसे, सहसचिव राजेश दळवी, सहखजिनदार पवन म्हात्रे तसेच सदस्य आकेश हारपाल, राहुल उंबरे, गणेश राणे, प्रथमेश कदम, महेश किर्दत, राजा नायकोडे, योगेश कासार, सिद्धेश तेलंगे आदी परिश्रम घेत आहे.

## धोनीच्या कमबॅकची चाहत्यांना प्रतीक्षा

**चेन्नई : वृत्तसंस्था**

पाच वेळच्या आयपीएल चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्ज संघाने यंदा सुरुवातीचे तिन्ही सामने गमावले असून ते गुणतालिकेत अखेरच्या स्थानी आहेत. संघाचा आयकॉन आणि माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी पोटरीच्या दुखापतीने त्रस्त असल्याने सुरुवातीचे सामने मैदानात उतरू शकला नाही.

माध्यमांतील वृत्तानुसार धोनी एम.ए. चिदंबरम स्टेडियम (चेपॉक) येथे दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणारा घरच्या सामन्यात खेळू शकणार नाही, पण तो पूर्णपणे फिट असेल, तर १४ एप्रिल रोजी कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर)विरुद्धच्या पुढील सामन्यात पुनरागमन करेल, मात्र सीएसकेने धोनीच्या पुनरागमनाबाबत अद्याप कोणतेही निवेदन जारी केलेले नाही. त्यामुळे धोनी मैदानावर उतरत संघाला कधी सावरणार याकडे सीएसके चाहत्यांच्या नजरा आहेत.

# आरडीसीए प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत पेणचा बाप्पा संघ उपांत्य फेरीसाठी पात्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुषांच्या खुल्या गटाची टी-२० प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा सध्या पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर सुरू आहे. स्पर्धेतील प्ले ऑफ फॉरमॅटमधील एलिमिनेटर फेरीच्या सामन्यात स्थानिक बाप्पा संघाने चमकदार कामगिरी करत उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे.



अटीतटीच्या सामन्यात पेण बाप्पा संघाने के.श्री. वॉरियर्स संघावर तीन गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना वॉरियर्स संघाने निर्धारित २० षटकांमध्ये सात गडी गमावत १५४ धावसंख्या उभारली होती. त्यामध्ये निकुंज विठलानी याने दमदार फलंदाजी करत सर्वाधिक ४४ धावा काढल्या, तर सलामीवीर फलंदाज ओंकार गावडेने २६, विराज कुथे २७, तेजस गिलबिलेने २२ धावांची खेळी केली. पेण संघाकडून जबजीत सिंह याने दोन, तर ऋषभ शर्मा व सागर मुळे यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

१५४ धावसंख्येचा पाठलाग करताना पेण बाप्पा संघाचे शेवटच्या षटकात संघाचे सात फलंदाज बाद झाले असताना १५५ धावसंख्येचे लक्ष पूर्ण केले. त्यामध्ये भावेश पाटील याने चौफेर फटकेबाजी करत सर्वाधिक ५९ धावा काढल्या. त्याला दुसऱ्या बाजूने विनय ठाकूर २६, सागर मुळे २५, तर शेखर भगत याने बहुमूल्य २३ धावांचे योगदान संघाला देऊन विजय मिळवून दिला. वॉरियर्स संघाकडून कौस्तुभ म्हात्रे आणि सिद्धांत म्हात्रे यांनी प्रत्येकी दोन, तर स्वराज्य थारकुडे आणि रोहित कार्ले यांनी प्रत्येकी एका फलंदाजाला तंबूत धाडले.

सामनावीर म्हणून भावेश पाटील याला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, प्रशिक्षक साई मेढेकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# आयुष शेट्टीची आशियाई बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक

**निंगबो (चीन) : वृत्तसंस्था**

भारताच्या आयुष शेट्टीने कारकीर्दीतील सर्वांत मोठ्या विजयाची नोंद करताना आशियाई अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. आयुषने जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या, पण स्पर्धेत तिसरे मानांकन मिळालेल्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीला पराभवाचा धक्का दिला.

जागतिक क्रमवारीत २५व्या क्रमांकावर असलेल्या आयुषने अष्टपैलू खेळ आणि जोरदार स्मॅशच्या जोरावर उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत २३-२१, २१-१७ असा विजय मिळवला.



उपांत्य फेरीत आयुषची अग्रमानांकित थायलंडच्या कुनलावत वितिदसर्नशी गाठ पडेल. वितिदसर्न पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेता आहे.

उपांत्यपूर्व लढतीत पहिल्या गेमच्या सुरुवातीला आयुषने २-० आणि ५-३ अशी आघाडी घेतली होती, परंतु नंतर जोनाथनने आयुषला ‘बॅकलाईन’वर रोखले. गेमच्या अखेरच्या टप्प्यात जोनाथन १८-१६ अशी आघाडी राखून होता. या स्थितीत आयुषने जोरकस प्रतिकार करत १८-१८ अशी बरोबरी साधली, मात्र एक फटका बाहेर गेल्याने जोनाथनला दोन ‘गेम पॉइंट्स’ मिळाले. यातील एक पॉइंट जोनाथनने मिळवला.

नंतर जोनाथनकडून चुका झाल्या आणि आयुषने पहिला गेम अखेरच्या क्षणी जिंकला. आयुषने दुसर्या गेममध्ये अधिक आक्रमकता दाखवली आणि जोनाथनला निष्प्रभ केले.

# आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत १६ पदकांसह भारत दुसऱ्या स्थानी

## विश्वनाथ सुरेशने रचला नवा इतिहास

**उलानबटार : वृत्तसंस्था**

आशियाई अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत अखेरच्या दिवशी पुरुष गटात भारताच्या विश्वनाथ सुरेश (५० किलो) याने विजय मिळवून भारताच्या मोहिमेची ‘सुवर्ण’ सांगता केली. अंतिम सामन्यात विश्वनाथने जपानच्या दाइची इवाईचा ५-० अशा एकतर्फी वर्चस्वासह पराभव केला. सचिनला (६० किलो) अटीतटीच्या लढतीत पराभव पत्करावा लागल्यामुळे रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

भारताने एकूण पाच सुवर्ण, स्पर्धेत सर्वाधिक १५ पदकांची कमाई केली, मात्र कझाकस्तानच्या सर्वाधिक सहा सुवर्ण पदकांमुळे भारताला पदकतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर राहावे लागले. असे असले तरी भारतासाठी हे यश ऐतिहासिक ठरले. महिला खेळाडूंचे यश भारताच्या कामगिरीचे वैशिष्ट्य ठरले. भारतीय महिला बॉक्सिंगपटूंनी चार सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य अशी एकूण १० पदके मिळवली.

विश्वनाथचे हे सुवर्णपदक त्याच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. राष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी केल्यानंतर त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली मोहोर उमटवली आहे.

# ‘वैभव सूर्यवंशीला टीम इंडियात स्थान द्यावे’

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय क्रिकेटमध्ये सध्या एका नव्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे, ते नाव म्हणजे वैभव सूर्यवंशी. अवघ्या १५व्या वर्षी आपल्या आक्रमक फलंदाजीने या तरुणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याच्या प्रतिभेने केवळ चाहत्यांनाच नाही, तर क्रिकेटमधील दिग्गजांनाही प्रभावित केले असून आता त्याला टीम इंडियात स्थान देण्याची मागणी जोर धरत आहे.

वैभवच्या या वेगवान खेळामागे त्याची सातत्यपूर्ण कामगिरी आणि आत्मविश्वास आहे. त्याचे कोच मनीष ओझा यांनी म्हटले की, वैभवने आता टेकऑफ घेतला आहे आणि त्याला टीम इंडियात आणण्याची वेळ आली आहे. त्यांच्या मते, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आता अधिक वाट पाहू नये आणि आगामी मालिकांमध्ये त्याला संधी द्यावी.

वैभव टीम इंडियात आला, तर तो कोणाच्या जागी खेळणार हा प्रश्नही उपस्थित होत आहे. यावर उत्तर देताना मनीष ओझा यांनी सांगितले की, मोठे खेळाडू कोणाची जागा घेत नाहीत, ते स्वतःची जागा निर्माण करतात. त्यांनी उदाहरण देत सांगितले की, राजस्थान रॉयल्समध्ये वैभवने स्वतःच्या कामगिरीच्या जोरावर स्थान मिळवले आहे.

संघरचनेच्या दृष्टीने पाहता ओपनिंग स्लॉटमध्ये स्पर्धा अधिक आहे. यावर बोलताना ओझा यांनी अभिषेक शर्माचे नाव घेतले. त्यांच्या मते, अभिषेकच्या अस्थिर कामगिरीमुळे वैभवला संधी मिळू शकते. त्यांनी सुचवले की, वैभवने संजू सॅमसन किंवा इशान किशन यांच्यासोबत ओपनिंग करावी.

कोच ओझा यांनी आणखी एक मोठा दावा करत सांगितले की, आयपीएल २०२६नंतर होणाऱ्या प्रत्येक टी-२० मालिकेत वैभव सूर्यवंशी टीम इंडियासाठी खेळताना दिसू शकतो. त्यांच्या मते, आयर्लंडविरुद्धच्या मालिकेतून त्याची सुरुवात होऊ शकते आणि त्यानंतर झिम्बाब्वे दौऱ्यातही तो संघाचा भाग असेल.

# वैभवची गाडी सुस्साट! ऑरेंज कॅपवरही कब्जा

**मुंबई : प्रतिनिधी**

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशी आयपीएलमध्ये आपल्या फलंदाजीने धुमाकूळ घालत आहे. प्रत्येक सामन्यातील आपल्या वादळी खेळीच्या बळावर तो सर्वांचे लक्ष वेधून घेतो. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात त्याने १५ चेंडूत अर्धशतक झळकावत मोठ्या विक्रमाची नोंद केली आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध वैभव सूर्यवंशीच्या वादळी खेळीच्या (२६ चेंडूत ७८ धावा) जोरावर राजस्थान संघाने शुक्रवारचा सामना सहा विकेट्सने जिंकला. इंडियन प्रीमियर लीगच्या इतिहासात पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक वेळा ५० किंवा त्याहून अधिक धावांचा विक्रम आता वैभव सूर्यवंशीच्या नावावर झाला आहे.

आरसीबीविरुद्ध अवघ्या १५ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करून वैभवने केएल राहुल, यशस्वी जैस्वाल, इशान किशन आणि वृद्धिमान साहा यांना मागे टाकले. या सर्व खेळाडूंच्या नावावर



भारतीय खेळाडू म्हणून आयपीएल पॉवरप्लेमध्ये दोन अर्धशतके किंवा त्याहून अधिक धावा करण्याचा विक्रम आहे. आयपीएल पॉवरप्लेमध्ये डावांच्या बाबतीत वैभव आता जोस बटलरसोबत संयुक्तपणे अव्वल स्थानी आहे.

वैभव सूर्यवंशी हा आयपीएलच्या पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक वेळेस अर्धशतक करणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने आतापर्यंत तीन वेळा अर्धशतके झळकावली आहेत. एवढेच नाही तर आपला सहकारी यशस्वी जैस्वालला मागे टाकत त्याने ऑरेंज कॅपवरही कब्जा केला.

वैभव सूर्यवंशीने चार सामन्यातील चार डावात ५०च्या सरासरीने सर्वोच्च २६६.६७च्या स्ट्राईक रेटसह २०० धावा आपल्या खात्यात जमा केल्या आहेत. यशस्वी जैस्वाल १८३ धावांसह त्याच्यापाठोपाठ दुसऱ्या स्थानावर आहे.

### विराटकडून शाब्बासकी!

आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहून आरसीबीचा माजी कर्णधार विराट कोहली भारावून गेला. सामन्यानंतर विराटने त्याला खास गिफ्ट दिले आहे. सामना संपल्यावर वैभव विराट कोहलीकडे त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी गेला. त्यावेळी विराटने वैभवच्या टोपीवर प्रिय वैभव, खूप छान खेळलास, असे लिहिले.

# ‘कँडिडेट्स’ बुद्धिबळ स्पर्धेत भारतीयांचा कस

**सायप्रस : वृत्तसंस्था**

सायप्रस बेटावर जागतिक विजेतेपदासाठी आव्हानवीर ठरवण्याकरिता सुरू असलेल्या ‘कँडिडेट्स’ बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या आणि महिला विभागात अनुक्रमे उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर जावोखिर सिंदारोव आणि भारताची ग्रँडमास्टर रमेशबाबू वैशाली यांनी १० फेऱ्यांनंतर आघाडी घेतली आहे. सिंदारोवने प्रतिस्पर्ध्यांवर तब्बल दोन गुणांची आघाडी घेतली आहे, तर वैशाली अवघ्या अर्ध्या गुणाने चीनच्या झू जिनेर आणि युक्रेनच्या ॲना मुझिचुक यांच्या पुढे आहे. त्यामुळे दर्जेदार खेळ सुरू ठेवत ही आघाडी टिकवण्याचेच आता वैशालीसमोर आव्हान असेल.



भारताचे आशास्थान असलेल्या प्रज्ञानंद आणि दिव्या देशमुख यांचे दहाव्या फेरीतील पराभव त्यांच्या आशांवर पाणी फेरणारे ठरले. तरीही महिला विभागात इतकी चुरस आहे की सलग दोन पराभवानंतरही गुणतालिकेत सातव्या क्रमांकावर असलेल्या दिव्याच्या आशा अजूनही कायम आहेत, मात्र तिने आपली पराभवाची मालिका खंडित करणे गरजेचे आहे. नागपूरची ही विश्वचषक विजेती ते करण्याची क्षमता निश्चितच बाळगते.

सिंदारोवच्या विजयामागील गणित वेगळेच आहे. सामान्यतः खेळाडू स्पर्धेदरम्यान अनुभवी साहाय्यकांची टीम ठेवतात, मात्र २० वर्षीय सिंदारोवचे मदतनीस त्याच्याहून लहान असलेले ग्रँडमास्टर मुखिद्दीन मादामिनोव्ह आणि त्याचा धाकटा भाऊ इसलोमबेक सिंदारोव आहेत. प्रज्ञानंदविरुद्ध नवव्या चालीत चूक केल्यानंतर त्याला विजयासाठी कठोर संघर्ष करावा लागला.

वैशालीची २०२४च्या ‘कँडिडेट्स’ स्पर्धेतील कामगिरी पाहता ती आता अधिक प्रगल्भ झाल्याचे जाणवते. त्या वेळी पहिले चार डाव गमावल्यानंतर तिने सलग पाच विजय मिळवले होते, मात्र यावेळी ती परिस्थितीनुसार खेळताना दिसत आहे. दिव्याविरुद्ध आक्रमक खेळणारी वैशाली मुझिचुकविरुद्ध मात्र संयम राखून खेळली. वैशालीला गाठण्यासाठी अनावश्यक धोके पत्करणाऱ्या झू जिनेरला बिबिसाराने पराभूत केले. दोघींमधील गेले पाच डाव बिबिसाराने जिंकले आहेत. त्यामुळे झूचा हा निर्णय आत्मघातकी ठरला असे म्हणावे लागेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com